सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. ०४ ऑगस्ट २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १११ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## साईभक्तांसाठी सुवर्णपर्व श्री साईसच्चरित्र पारायण स्पर्धांमध्ये पाच लाखांची 51 भव्य बक्षिसे

**शिर्डी (प्रतिनिधी) :** श्री साईबाबांच्या पवित्र नगरीत यंदाचा श्रावण महिना साईभक्तांसाठी भक्ती, ज्ञान, संस्कार आणि सेवाभावाचा अविस्मरणीय सोहळा ठरणार आहे. "साईचरित्र हा केवळ वाचण्याचा ग्रंथ नसून तो जगण्याचा ग्रंथ आहे," या पवित्र विचारातून साकारत असलेल्या श्री साईसच्चरित्र पारायण परीक्षा २०२६ या अभिनव उपक्रमासाठी यशस्वी उद्योजक, साईसेवक व साईभक्त भाऊसाहेब रामचंद्र चौधरी यांनी ५ लाखांच्या एकूण ५१ भव्य बक्षिसांची घोषणा करून या उपक्रमाला नवी ऊर्जा आणि नवे बळ दिले आहे. या बक्षिसांच्या रकमेची अधिकृत सुपूर्दगी आज परीक्षेचे समन्वयक . रवींद्र जोशी यांच्याकडे करण्यात आली. यावेळी श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्षक गाडीलकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे, शिर्डीचे प्रथम नगराध्यक्ष कैलास कोते , मंदिर प्रमुख विष्णुपंत थोरात, शिर्डीच्या नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई थोरात, उपनगराध्यक्ष अभय शेळके , विजयराव कोते , कमलाकर कोते, उद्योजक साईनाथ भाऊसाहेब चौधरी, रमेश गोंदकर, ज्योती पतसंस्थेचे चेअरमन रवीकाका बोरावके , सचिन तांबे, शिवाजी चौधरी, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक केले. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गोरक्षक गाडीलकर यांच्या मार्गदर्शनानुसार यंदा २१ महिला पारायणार्थी, २१ पुरुष पारायणार्थी तसेच १० उत्तेजनार्थ अशी एकूण ५२ बक्षिसे प्रदान करण्यात येणार आहेत. या बक्षिसांमध्ये रोख पारितोषिकांसह सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे, चांदीची नाणी, चांदीच्या मूर्ती, पितळी देवघरातील दिवे आणि इतर आकर्षक भेटवस्तूंचा समावेश असणार आहे. २०२५ मध्ये शिर्डीच्या इतिहासात प्रथमच झालेल्या श्री साईसच्चरित्र पारायण परीक्षेला साईभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. त्या ऐतिहासिक यशानंतर यंदा हा उपक्रम अधिक भव्य, अधिक व्यापक आणि अधिक प्रभावी स्वरूपात आयोजित करण्यात येत असून शिर्डीसह देश-विदेशातील साईभक्तांमध्ये उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### विद्यार्थी आंदोलन प्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं दिलं स्पष्टीकरण,

## राज्यांना फौजदारी खटले मागे घेण्याचे स्वातंत्र्य

**नवी दिल्ली :** दिल्लीत काही दिवसांपूर्वी विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी देशातील निवडक राज्यांमध्येही विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. आंदोलनावेळी पोलिसांवर हल्ला होणे, सार्वजनिक संपत्तीची नासधूस करणे असे प्रकार घडले. यामुळे ठिकठिकाणी हिंसा करणाऱ्यांविरोधात गुन्हे नोंदविण्यात आले. आता या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांना उद्देशून स्पष्ट निर्देश दिले आहेत.

ज्या राज्यात विद्यार्थ्यांविरोधात गुन्ह्याची नोंद झाली आहे त्या राज्याचे सरकार त्यांच्या अधिकारात कोणता गुन्हा मागे घ्यावा आणि कोणता कायम ठेवावा याचे निर्णय घेण्यास स्वतंत्र आहे. कायद्याच्या चौकटीत राहून ते असे निर्णय घेऊ शकतात, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या खुलाश्यानंतर राज्य सरकारे



कायद्यानुसार फौजदारी खटले बंद करण्यास किंवा मागे घेण्यास स्वतंत्र आहेत. न्यायालयाने हेही स्पष्ट केले की, त्यांच्या पूर्वीच्या आदेशातील 'गुन्हेगारी पार्श्वभूमी' हा शब्दप्रयोग केवळ गंभीर आणि घृणास्पद गुन्ह्यांचा आरोप असलेल्या व्यक्तींनाच लागू होतो.

याआधी २८ जुलै २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्या पण आंदोलन करतेवेळी पकडण्यात आलेल्यांना विद्यार्थ्यांना सोडून देण्याचा आदेश दिला होता. न्यायालयाने आंदोलनावेळी पोलिसांनी केलेले आरोप आणि विद्यार्थ्यांनी पोलिसांवर केलेले आरोप यांच्यातील सत्यतेची पडताळणी करण्यासाठी स्वतंत्र चौकशी समिती नेमणार असल्याचे सूतोवाच केले आहे. या समितीत फक्त सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानेच सदस्य नियुक्त होणार आहेत. तसेच ही समिती थेट सर्वोच्च न्यायालयाच्या अखत्यारित काम करणार आहे.

कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस पॅलेट गन वापरू शकतात. पण त्यासाठी निश्चित अशी कार्यप्रणाली तयार करावी आणि त्याची माहिती द्यावी; असेही निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र आणि राज्यांच्या गृहमंत्रालयाला दिले आहेत. या प्रकरणात पुढील सुनावणी मंगळवार १८ ऑगस्ट २०२६ रोजी होणार आहे.

## लैंगिक छळ प्रकरणात बृजभूषण शरण सिंह निर्दोष



**नवी दिल्ली :** भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष आणि माजी खासदार बृजभूषण शरण सिंह यांना महिला कुस्तीपटूंच्या कथित लैंगिक छळ प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे. दिल्लीतील राऊस अव्हेन्यू न्यायालयाने पुरेसे पुरावे उपलब्ध नसल्याचे नमूद करत त्यांची आणि सहआरोपी विनोद तोमर यांची निर्दोष मुक्तता केली. न्यायालयाचा निकाल जाहीर होताच त्यांच्या समर्थकांनी आनंद व्यक्त करत जल्लोष केला.

निर्णयानंतर माध्यमांशी बोलताना बृजभूषण शरण सिंह यांनी सांगितले की, आरोप झाल्याच्या पहिल्या दिवसापासून आपण निर्दोष असल्याचे सांगत होतो. "जर माझ्यावरील एकही आरोप सिद्ध झाला असता, तर मी स्वतःला फाशी दिली असती. आज न्यायालयाने मला सन्मानाने निर्दोष मुक्त केले आहे. हा दिवस माझ्यासाठी आणि माझ्या समर्थकांसाठी आनंदाचा आहे," असे त्यांनी म्हटले.

## सरसंघचालक साधणार 'जेन-झी'शी संवाद

**मुंबई :** देशातील तरुण पिढी सध्या लोकशाही, नेतृत्व आणि राष्ट्रउभारणीसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर सक्रियपणे विचारमंथन करत असताना, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत येत्या ६ ऑगस्ट रोजी मुंबईत नव्या पिढीच्या प्रतिनिधींशी (जेन-झी) संवाद साधणार आहेत. 'इंडियाज इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनायटेड नेशन्स' (आयआयएमयूएन) या संस्थेच्या १५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक चॅम्पियनशिप परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यात सरसंघचालक उपस्थित राहून तरुणांना मार्गदर्शन करतील.

जगातील सर्वात मोठ्या युवा नेतृत्व संमेलनांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या तीन दिवसीय परिषदेत देशभरातील १०० हून अधिक शहरांमधील १५ ते १९ वयोगटातील दोन हजारांपेक्षा जास्त शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी होणार आहेत. ऋषभ शाह यांनी २०११ मध्ये स्थापन केलेली 'आयआयएमयूएन' ही



संस्था भारताची संस्कृती आणि विचारसरणी जागतिक पटलावर रुजवणारे एक प्रमुख व्यासपीठ म्हणून ओळखली जाते. विशेष म्हणजे, गेल्या १५ वर्षांपासून १५ ते २४ वयोगटातील तरुणच या संस्थेचा संपूर्ण कारभार सांभाळत आहेत. या मंचावरून घडलेले अनेक तरुण आज लोकप्रतिनिधी, आयएएस अधिकारी, आयपीएस अधिकारी, वकील, लेखक आणि यशस्वी उद्योजक म्हणून कार्यरत आहेत.

या संस्थेच्या सल्लागार मंडळात प्रसिद्ध उद्योगपती अजय पिरामल, दीपक पारेख आणि नादिर गोदरेज यांच्यासह खासदार डॉ. शशी थरूर, माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, चित्रपट दिग्दर्शक करण जोहर आणि महान धावपटू पी. टी. उषा यांसारख्या नामवंत व्यक्तिमत्त्वांचा समावेश आहे.

## सदर बाजार चौकातील 'तबक्कल चायनीज' सील; चिकन व मसाल्यांचे नमुने जप्त, दुकान उघडण्यास बंदी!

### अंबाजोगाईत FDA च्या पथकाची धडक कारवाई; अंबाजोगाईत भेसळीच्या बाजारावर मोठा घाव.व्यापाऱ्यांत मोठी खळबळ!

तभा वृत्तसेवा

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहरात अन्न सुरक्षा व औषध प्रशासन (FDA) विभागाने मोठी धडक कारवाई करत भेसळीच्या संशयावरून सदर बाजार चौक, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय रस्त्यावरील 'तबक्कल चायनीज' या खाद्य व्यावसायिक आस्थापनावर छापा टाकला.

या कारवाईसाठी तब्बल १० ते १२ अधिकाऱ्यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले होते. पथकाने दुकानातील चिकन तसेच विविध मसाल्यांचे नमुने (Samples) तपासणीसाठी घेतले. त्यानंतर संबंधित आस्थापनेला नोटीस बजावून नमुने तपासणीचा अहवाल येईपर्यंत दुकान सुरू करण्यास बंदी घालण्यात आली असल्याची माहिती मिळाली आहे.

अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, प्रयोगशाळेतील अहवालात नमुने सुरक्षित व निकषांनुसार असल्याचे सिद्ध झाल्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाईल. अहवाल प्रतिकूल आल्यास संबंधितांवर Food Safety and Standards Act, 2006 तसेच त्याअंतर्गत लागू असलेल्या नियमांनुसार कठोर कारवाई होऊ शकते.

**FDA चे महत्त्वाचे नियम :** अन्नपदार्थ सुरक्षित, स्वच्छ व दर्जेदार असणे बंधनकारक, संशयित अन्नपदार्थांचे नमुने घेऊन मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत तपासणी केली जाते, निकृष्ट किंवा भेसळयुक्त अन्न आढळल्यास दंड,परवाना निलंबन किंवा रद्द करणे तसेच न्यायालयीन कारवाईची तरतूद आहे, गंभीर प्रकरणांमध्ये दोषी आढळल्यास कारावासाचीही शिक्षा होऊ शकते.

या धडक कारवाईमुळे अंबाजोगाई शहरातील खाद्य व्यवसायिकांमध्ये मोठी खळबळ उडाली असून, नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर FDA ची नजर अधिक कडक झाल्याची चर्चा सुरू आहे. येत्या काळात शहरातील इतर खाद्य आस्थापनांचीही तपासणी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**अंबाजोगाईत भेसळखोरांना इशारा :** नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना आता FDA चा दणका बसणार.







सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# संस्कारमध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती संपन्न



**बीड (प्रतिनिधी) :** येथील संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली/ दुसरी विभागांमध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर मुख्याध्यापिका श्रीमती शोभाताई कुलकर्णी आणि विभाग प्रमुख श्रीमती विद्याताई पारगांवकर , विशेष वक्त्या श्रीमती शेजाळ एस.एम. श्रीमती खवले व्ही. एम. व श्री. टेकाळे ए .आर. उपस्थित होते. त्यांच्या हस्ते माता सरस्वती ,लोकमान्य टिळक व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी या राष्ट्रीय नेत्यांबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. श्रीमती. शेजाळ एस .एम. यांनी विविध उदाहरणाद्वारे लोकमान्य टिळक व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची विद्यार्थ्यांनाओळख करून दिली. त्यासोबतच लोकमान्य टिळक जयंती ते लोक पुण्यतिथी म्हणजे दिनांक 23 /7/ 2026 ते 01/08/2026 या यादरम्यान टिळकांच्या जीवनावर आधारित कथामाला हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमांतर्गत टिळकांच्या जीवनातील विविध घटना तसेच त्यांच्या जीवन चरित्रावर आधारित सर्व शिक्षक वृंदांनी विद्यार्थ्यांना कथा सांगितल्या.

# राज्य उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सुनील रेवडकर यांचा सत्कार

**बीड, 03 ऑगस्ट :** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक प्रयोगशाळा सहाय्यक व परिचर कर्मचारी संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सुनील रेवडकर यांचा न्यू हायस्कूल थर्मल परळी वैजनाथ तसेच नवीन प्राथमिक शाळा थर्मल परळी वैजनाथ यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. छत्रपती संभाजीनगर येथे नुकतीच महाराष्ट्र राज्य शैक्षणिक प्रयोगशाळा सहाय्यक व परिचर कर्मचारी संघटनेची राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण सभा उत्साहात पार पडली. या सभेला संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हिरेमठ (मुरूम, धाराशिव) तसेच प्रमुख संघटना सल्लागार बामणे (अंबेजोगाई) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या सभेत सुनील रेवडकर यांचे यापूर्वीचे कार्य पाहता त्यांची राज्य उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

# बीड-संतोष देशमुख हत्या प्रकरणात पुढील सुनावणी 5 ऑगस्ट रोजी

**बीड, 03 ऑगस्ट :** संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपी महेश केदार यांच्या जामीन अर्जावर युक्तिवाद करण्यासाठी आरोपीच्या वकिलांनी वेळ मागितला. कोर्टाने पुढील तारीख 5 ऑगस्ट दिली आहे. निशाणी क्रमांक 211, 212 आणि 213 या अर्जामध्ये एकत्रित दोषारोप पत्र करता येत नाहीत. असा अर्ज आहे.. या संदर्भात आरोपीने उच्च न्यायालयात अर्ज केला ते प्रकरण प्रलंबित आहे म्हणून कोर्टाने या तीन अर्ज तात्पुरत्या स्वरूपात आहे त्या परिस्थितीत ठेवले आहेत. अशी माहिती सहाय्यक सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे यांनी दिली.

# चौसाळा महाविद्यालयात नशा मुक्त युवा संकल्प अभियानाचा प्रारंभ

**चौसाळा :** कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने नशामुक्त युवा फॉर विकसित भारत या संकल्प अभियानाचा दिनांक 2 ऑगस्ट 2026 रोजी प्रारंभ झाला. आपल्या देशातील सर्वच क्षेत्राचा सर्वांगीण विकास करावयाचा असेल आणि 2047 पर्यंत विकसित भारत ही संकल्पना दृढ करायची असेल तर देशातील तरुण हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. आणि हाच तरुण नशा मुक्त करण्यासाठी आज महाविद्यालयात शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित खाकरे होते तर व्यासपीठावर पदव्युत्तर संचालक डॉ. सुधाकर वनवे, कमविचे उपप्राचार्य श्री गणपती ढवशंक प्रा. भागवत कुरुंद उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अमर अलदे यांनी सर्वांना नशा मुक्त अभियानाची शपथ दिली. कार्यक्रमाचे आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. देशमुख यांनी व्यक्त केले यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी प्राध्यापक कर्मचारी उपस्थित होते.

# राहुल निवासी वस्तीगृहात 'लेखन प्रेरणा दिन' उत्साहात

**बीड :** शब्दांना संघर्षाची धार आणि साहित्याला समाजपरिवर्तनाची दिशा देणाऱ्या साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त राहुल मागासवर्गीय निवासी वस्तीगृहात शनिवारी (दि.१) 'लेखन प्रेरणा दिन' उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या साहित्यिक, सामाजिक आणि मानवतावादी कार्याला विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास वस्तीगृहाचे अधीक्षक बी. जे. साळवे यांच्यासह भालेराव सर, जोंधळे सर, शिंदे सर, वाघमारे सर आणि गायकवाड सर उपस्थित होते. मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांची आजही असलेली सामाजिक उपयुक्तता अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन आणि समाजसेवेची प्रेरणा त्यांच्या कार्यातून घ्यावी, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमास वस्तीगृहातील विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.वसंतराव देशपांडे स्मृतीदिनी रंगलीसुरांची मैफल



**अंबाजोगाई :** संगीताच्या बागेतील ब्रम्हकमळ संगीतसूर्य स्व.डॉ.वसंतराव देशपांडे यांच्या पुण्यस्मृतीदिनी सुरांची मैफल रंगली संगीत मैफलीची सुरुवात प्रा.अतुल अरुणराव जोशी यांनी केली नंतर बी.के.पांडे,डॉ.अतुल कुंबेफळकर,सुचिता देशपांडे, वीरा जोशी,राहुल देशपांडे आदींनी गायनाचे सादरीकरण केले.हार्मोनिअमवर बी.के.पांडे यांनी तर तबल्यावर रत्नदीप शिगे यांनी साथसंगत केली. उपस्थितांचे आभार प्रा.अतुल जोशी यांनी मानले.उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. यावेळी श्रीमती आरती जोशी यांच्यासह इतर रसिक उपस्थित होते.

# माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शिरपेचात मानाचा तुरा

## शासकीय कापूस खरेदीत बाजार समिती अव्वलस्थानी तर सीसीआयला सर्वाधिक कापूस दिल्याबद्दल रेखाबाई डरफे यांचा सन्मान



**माजलगाव, प्रतिनिधी :** माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने शासकीय कापूस खरेदीमध्ये कापूस विभाग प्रमुख सुनील सवणे यांचे मार्गदर्शनाखाली आणि सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी समन्वय साधत

उत्कृष्ट नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि शेतकरीहिताचे कार्य करत संभाजीनगर विभागातून विक्रमी खरेदी केली. याचबरोबर बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील महिला शेतकरी सौ. रेखाबाई सुभाष डरफे यांचा छत्रपती संभाजीनगर येथे केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री ना. गिरीराज सिंह यांच्या हस्ते शासकीय कापूस निगम लिमिटेड (CCI) च्या वर्धापन दिनानिमित्त १ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर येथील एमआयटी कॉलेजमध्ये आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात राज्यस्तरीय सन्मान झाल्याने माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

या कार्यक्रमाला केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह, राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, पालकमंत्री संजय शिरसाट, मंत्री अतुल सावे, तसेच सीसीआयचे अध्यक्ष ललित कुमार गुप्ता व आयएएस अधिकारी पद्मिनी सिंगला यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात महाराष्ट्रातील निवडक प्रगतिशील शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी रेखाबाई डरफे यांना कापूस वेचणी यंत्र व प्रदूषण नियंत्रण किट प्रदान करण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे, उपसभापती श्रीहरी नाना मोरे, सचिव हरिभाऊ सवणे व संचालक मंडळाने त्यांचे अभिनंदन केले. हा सन्मान माजलगाव तालुक्यासाठी गौरवास्पद असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

### परळी : तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून साकारलेल्या भव्य भक्त निवासाची धनंजय मुंडेंकडून पाहणी

# श्रावण महिन्यात भाविकांसाठी भक्तनिवास खुले करण्याचा प्रयत्न : धनंजय मुंडे

## 12 कोटी रुपये प्राथमिक खर्च, 500 भक्तांची होणार सोय, कामे अंतिम टप्प्यात



**परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी) :** परळी वैद्यनाथ येथील श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून शहरातील नगर परिषद शेजारी भव्य चार मजली भक्त निवास उभारण्यात आले असुन, येथील कामांची आज माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी पाहणी केली.

सदर भक्तनिवास उभारणीत सुरुवातीच्या टप्प्यात १२ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून यामधून ८२ खोल्यांसह, स्वयंपाकगृह, भोजनकक्ष इत्यादी कामे पूर्ण झाली असून याठिकाणी ५०० भक्त एकच वेळी राहू शकतील इतकी क्षमता आहे.

सदर ठिकाणी पी ओ पी व फर्निचरचे काम बाकी असून श्रावण महिन्यात भाविकांसाठी हे भक्तनिवास खुले करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले. शहराच्या मध्यवर्ती भागात उभारलेले हे भव्य भक्त निवास वैद्यनाथ दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना नाममात्र शुल्कात उपलब्ध होणार असल्याने बाहेरून येणाऱ्या भाविकांची उत्तम सोय होणार आहे.

यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजा खान पठाण, बाजीराव धर्माधिकारी, रवींद्र गित्ते, श्रीकृष्ण कराड, सूर्यभान नाना मुंडे, वैजनाथराव सोळंके, अय्युबखान पठाण, निळकंठ चाटे, वैद्यनाथ मंदिर समितीचे सचिव राजेश देशमुख, मुख्याधिकारी श्री. निघळ, कंत्राटदार जाफर खान, शकील कुरेशी, जयपाल लाहोटी यांसह नगर अभियंता, नगरसेवक व पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# द्वारकादास मंत्री बँकेचा ऑडिटमध्ये सलग 'अ' वर्ग; ठेवी 65 कोटींवर, नेट एनपीए शून्य टक्क्यांवर



बीड | प्रतिनिधी

बँक ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था नसून, ती हजारो कुटुंबांच्या विश्वासाची आणि स्वप्नांची जपवणूक करणारी संस्था आहे. सहकार ही केवळ आर्थिक चळवळ नसून ती विश्वास, पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि परस्पर सहकार्य यांच्या भक्कम पायावर उभी असलेली लोकचळवळ आहे. आपल्या व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेने स्थापने पासून ही मूल्ये जपण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. गेल्या काही आर्थिक वर्षात अनेक आर्थिक आणि स्पर्धात्मक आव्हानांचा सामना करत असतानाही आपल्या सर्वांचे सहकार्याने बँकेने समाधानकारक प्रगती साधली असल्याचे आसल्याचे प्रतिपादन द्वारकादास मंत्री बँकेचे अध्यक्ष डॉ. आदीत्य सारडा म्हणाले.

बीड शहरातील बालाजी मंदिर सभागृहात २ ऑगस्ट रोजी व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेची ६४ वी वार्षिक सर्व साधारण सभा बँकेचे अध्यक्ष डॉ. आदित्य सारडा यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. बैठकीला सि.ए.गिरीश गिल्डा, डॉ.आदिती सारडा, अंजली पाटील, रघुनाथ चौधरी, डॉ.राहुल खडके, दिनेश देशपांडे,शेख मोहम्मद सलीम,प्रल्हाद वाघ, सुधाकर वैष्णव, सतीश धारकर, माजी संचालक अशोककुमार ओझा, सभासद शेख मुसाभाई, गणेश देशमुख, प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी मोमीन शफियोद्दिन, माजी मुख्यकार्यकारी अधिकारी राधेश्याम सोनी आदींची उपस्थिती होती.

# स्वच्छता निरीक्षक पदावरील समावेशनासाठी राज्यभरातील कर्मचाऱ्यांचा एल्गार; 15 ऑगस्टला मंत्रालयासमोर आत्मदहनाचा इशारा



**माजलगाव| प्रतिनिधी :** राज्यातील विविध नगर परिषद व नगरपंचायतींमध्ये कार्यरत स्वच्छता निरीक्षक पदासाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांनी आपल्या दीर्घकाळ प्रलंबित समावेशनाच्या मागणीसाठी आता आक्रमक भूमिका घेतली आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, नगरविकास मंत्री, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव, आयुक्त व इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन सादर करून तातडीने न्याय देण्याची मागणी करण्यात आली आहे. अनेक वर्षांपासून शासनाच्या निर्णयाची प्रतीक्षा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने संबंधित कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, ग्रामपंचायतीतून नगर परिषद व नगरपंचायतींमध्ये समाविष्ट झालेल्या अनेक कर्मचाऱ्यांनी शासनाने निश्चित केलेली पात्रता, सेवा अटी व आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण केली आहे. मात्र, प्रशासकीय दिरंगाईमुळे त्यांचा स्वच्छता निरीक्षक पदावरील समावेश अद्यापही प्रलंबित असून त्यामुळे वेतन, सेवाज्येष्ठता, पदोन्नती तसेच इतर शासकीय लाभांपासून ते वंचित राहत आहेत.

कर्मचाऱ्यांनी निवेदनात शासनाचे विविध नियम, शासन निर्णय, परिपत्रके आणि पूर्वी दिलेल्या आदेशांचा दाखला देत आपल्या मागणीची कायदेशीर बाजू स्पष्ट केली आहे. यापूर्वी काही प्रकरणांमध्ये शासनाने विशेष बाब म्हणून समावेशनास मान्यता दिल्याची उदाहरणे देत, समान न्यायाच्या तत्त्वावर आपल्या प्रकरणातही त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, पात्र उमेदवारांना केवळ प्रशासकीय कारणांमुळे न्याय मिळत नसल्याचा आरोप करत शासनाने या प्रकरणात विलंब न करता सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतरही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, शासनाने १० ते १४ ऑगस्ट २०२६ या कालावधीत स्वच्छता निरीक्षक पदावरील समावेशनाबाबत ठोस निर्णय घेतला नाही, तर १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी मंत्रालय, मुंबई येथे सामूहिक आत्मदहन आंदोलन करण्यात येईल, असा गंभीर इशारा अक्षय अंकुशराव धारक नगर परिषद माजलगाव इतर संबंधित कर्मचाऱ्यांनी दिला आहे. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

या निवेदनामुळे राज्यातील स्वच्छता निरीक्षकांच्या समावेशनाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, शासन याबाबत काय निर्णय घेते याकडे राज्यभरातील संबंधित कर्मचारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे लक्ष लागले आहे.

# संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली दुसरी विभागात पालक मेळावा संपन्न

**बीड (प्रतिनिधी) :** येथील संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली दुसरी विभागांमध्ये 'पालक मेळावा ' संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून व्यासपीठावर संस्कार प्रबोधिनीचे उपाध्यक्ष सन्माननीय भाऊसाहेब बोबडे सर , तसेच संचालक तथा शालेय समिती अध्यक्ष डॉ. अनुराग पांगरीकर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शोभा कुलकर्णी ,पहिली दुसरी विभागाच्या विभाग प्रमुख श्रीमती पारगावकर व्ही .सी. तिसरी चौथी विभागाचे विभाग प्रमुख श्रीयुत गिरी एस.डी. व पालक प्रतिनिधी म्हणून श्रीयुत विकास जानवे सर व्यासपीठावर उपस्थित होते.

या कार्यक्रमा प्रसंगी इयत्ता पहिली दुसरी विभागाच्या विभाग प्रमुख श्रीमती पारगांवकर व्ही. सी. यांनी आपल्या प्रास्ताविकातून शाळेला पालकांकडून असलेल्या अपेक्षा, त्यासोबतच विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शाळेत घेतले गेलेले विविध उपक्रम, पालक - शिक्षकांना येत असलेल्या अडचणी व त्या वरील विविध उपाय सुचवत, या पालक मेळाव्याचा नेमका उद्देश पालकांना पटवून दिला.

श्रीमती खवले व्ही. एम .यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, नवीन पाठ्यक्रम, त्यानुसार विद्यार्थ्यांच्या अपेक्षित क्षमता कशाप्रकारे बदलत गेल्या आहेत हे पालकांना लक्षात आणून दिले.

याप्रसंगी पालक प्रतिनिधी म्हणून व्यासपीठावर उपस्थित असलेले.सन्माननीय पालक श्रीयुत विकास जानवे सर यांनी शाळेत सुरू असलेल्या विविध उपक्रमाबद्दल व एकंदरीत शैक्षणिक वातावरणाबद्दल समाधान व्यक्त करत, संस्कार विद्यालयाच्या सर्व संचालक मंडळाचे ,सर्व शिक्षक वृंदांचे अभिनंदन करून ,आपल्या अपेक्षा व्यक्त केल्या.

माननीय मुख्याध्यापक यांनी आपल्या मनोगत मधून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पालकांनी शिक्षकांना सहकार्य करण्याची विनंती केली. डॉ. अनुराग पांगरीकर यांनी पालकांशी संवाद करत असताना असे मत व्यक्त केले की , विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास पालक व शिक्षक यांच्या योगदानातून घडत असतो . विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भावनिक, शारीरिक प्रगतीसाठी शिक्षक व पालकांनी सतत प्रयत्नशील राहावे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शारीरिक व्यायाम व अवांतर वाचन या गोष्टीकडे पालकांनी विशेष लक्ष द्यावे.

# जयप्रभा विद्यालयात गुणवंत विद्यार्थी सत्कार संपन्न



**अंबाजोगाई :** कुंबेफळ येथील जयप्रभा विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. आदरणीय बाबूजी (डॉ. द्वारकादासजी लोहिया) यांनी सुरू केलेल्या जयप्रभा माध्यमिक विद्यालय, कुंबेफळ (ता.आंबाजोगाई) येथे कै. डॉ. श्वेता श्रीकांतराव सोनवणे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गेल्या अनेक वर्षांपासून इयत्ता दहावीच्या परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येतो. या प्रेरणादायी उपक्रमाचे आयोजन दरवर्षी विलास काका सोनवणे यांच्या परिवारातर्फे केले जाते.

या विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यास उपस्थित राहून कै. डॉ.श्वेता सोनवणे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अंबाजोगाईचे नगराध्यक्ष नंदकिशोरजी मुंदडा, जयप्रभा माध्यमिक विद्यालयाचे संचालक विलास काका सोनवणे, मंचकरावजी देशमुख, डॉ. पांडुरंग पौळ, नामदेव शिंदे, जयप्रभा माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बन्सी पवार तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना अनिकेत लोहिया यांनी सर्व गुणवंत विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन करुन आपल्या सर्वांच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांच्या यशाची ही परंपरा अधिकाधिक बहरत राहो हीच सदिच्छा व्यक्त केली. अंबानगरीचे नगराध्यक्ष नंदकिशोरजी मुंदडा यांनी जयप्रभा विद्यालयातील गुणवत्तेचा आलेख उंचावत रहावा यासाठी सकारात्मक विचारसरणी ठेवून शालेय जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रयत्न जिद्द व चिकाटीने प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

# लोकशाहीर, साहित्यरत्न डॉ.अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त आशादत्त गोशाळेत 106 वृक्षांचे रोपण

## टायगर ग्रुप, मराठवाडाचा पर्यावरण संवर्धनाचा स्तुत्य उपक्रम ; नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांचेकडून कौतुक



**अंबाजोगाई :** लोकशाहीर, साहित्यरत्न डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जोपासत आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत टायगर ग्रुप, मराठवाडा व आशादत्त बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने आशादत्त गोशाळा परिसरात भव्य वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विविध प्रजातींच्या १०६ वृक्षांचे रोपण करून लोकशाहीर, साहित्यरत्न डॉ.अण्णा भाऊ साठे यांना अनोखे अभिवादन करण्यात आले.

पर्यावरण संवर्धनाचा स्तुत्य उपक्रम राबविल्याबद्दल अंबाजोगाईचे नगराध्यक्ष नंदकिशोर (काकाजी) मुंदडा यांचेकडून टायगर ग्रुप, मराठवाडा यांचे कौतुक करण्यात आले.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असल्याची भावना व्यक्त करीत या उपक्रमात सहभागी झालेल्या अंबाजोगाई नगरपरिषदेचे नगराध्यक्ष नंदकिशोर (काकाजी) मुंदडा यांनी टायगर ग्रुपच्या पर्यावरणपूरक उपक्रमाचे आणि आशादत्त गोशाळेच्या सामाजिक कार्याचे विशेष कौतुक केले. वृक्षारोपणाबरोबरच त्यांचे संगोपन व संवर्धन करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. शहरातील आशादत्त बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या पुढाकारातून आयोजित या उपक्रमाद्वारे पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा प्रभावी संदेश देण्यात आला. डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांना कृतीतून अभिवादन करीत वृक्षारोपणाच्या माध्यमातून भावी पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याचा संकल्पही उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी आशादत्त बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तथा टायगर ग्रुप मराठवाडा अध्यक्ष पै.उमेश पोखरकर, नगरसेवक मालू जोगदंड, टायगर ग्रुपचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख कोंडीराम पवार, बापू उदार, शिवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष दिपक लामतूरे, कृष्णा नरसिंगे, करण जोगदंड, बालाजी रूद्राक्ष, अक्षय धारेकर, योगेश जिरे, डॉ.अशोक गायके, मारी जोगदंड यांच्यासह टायगर ग्रुपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## गौतम अदाणी यांच्याकडून पूरग्रस्तांसाठी मदत

**मुंबई :** अदाणी समूहाचे अध्यक्ष श्री. गौतम अदाणी यांनी आसाममधील पूरग्रस्त भागांतील मदत व पुनर्वसन कार्यासाठी आसाम मुख्यमंत्री सहायता निधीत 11 कोटी रुपयांचे योगदान दिले आहे. या योगदानाच्या पुढील टप्प्यात, अदाणी समूहाची सामाजिक विकास व कल्याण शाखा असलेल्या अदाणी फाऊंडेशनने,अदाणी स्मार्ट मीटर आणि अदाणी एअरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेड (एएएचएल) ची उपकंपनी तसेच भारतातील सर्वात मोठी खासगी विमानतळ संचालक कंपनी असलेल्या गुवाहाटी इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड (जीआयएएल) यांच्या सहकार्याने अप्पर आसाममध्ये पूरनिवारण मदत उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत सिवसागर जिल्ह्यातील नाझिरा उपविभाग आणि धेमाजी जिल्ह्यातील सिलापाथर येथे जवळपास 8,000 कुटुंबांपर्यंत मदत साहित्य पोहोचविण्यात येत आहे.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरची जुलै 2026 मध्ये 32,516 वाहनांची विक्री

**मुंबई :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने जुलै 2026 महिन्यातील विक्रीची आकडेवारी जाहीर केली आहे. कंपनीने या महिन्यात एकूण 32,516 वाहनांची विक्री केली. त्यापैकी देशांतर्गत बाजारात 30,516 वाहने विकली गेली. जुलै 2025 मध्ये ही संख्या 29,159 होती. त्यामुळे यंदा देशांतर्गत विक्रीत 5 टक्क्यांची वाढ झाली आहे. यंदा जानेवारी ते जुलै 2026 या सात महिन्यांत कंपनीने एकूण 2,33,854 वाहनांची विक्री केली. गेल्या वर्षी याच कालावधीत 2,07,497 वाहने विकली होती. त्यामुळे कंपनीने 13 टक्क्यांची वाढ नोंदवली आहे. तसेच, आर्थिक वर्ष 2026-27 मधील एप्रिल ते जुलै या पहिल्या चार महिन्यांत कंपनीने 1,28,746 वाहनांची विक्री केली. मागील आर्थिक वर्षातील याच कालावधीत ही संख्या 1,19,669 होती. त्यामुळे कंपनीच्या विक्रीत 8 टक्क्यांची वाढ झाली आहे.

## पुढच्या पिढीतील बुरशीनाशक सादर

**मुंबई :** बायरने आज झिवाना स्मार्ट या आपल्या नवीनतम बुरशीनाशक उत्पादनाच्या प्रारंभाची घोषणा केली. हे उत्पादन केवडा डाऊनी मिल्ड्यू आणि लेट ब्लाइट अशा विनाशकारी रोगांपासून उच्च-मूल्याच्या फळबाग पिकांचे संरक्षण करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. एफआरएसी गट ४९ अंतर्गत असलेल्या नवीन सक्रिय घटकाच्या साहाय्याने झिवाना स्मार्ट द्राक्षे,काकडीवर्गीय पिके,बटाटा आणि टोमॅटोमध्ये उत्कृष्ट रोग नियंत्रण प्रदान करते. त्यामुळे शेतकऱ्यांना पिकाची गुणवत्ता जपण्यास,उत्पादकता सुधारण्यास आणि परतावा वाढविण्यात मदत होते.डाऊनी मिल्ड्यू आणि आणि लेट ब्लाइट हे फळबाग पिकांवर परिणाम करणाऱ्या सर्वात विनाशकारी रोगांपैकी आहेत आणि अनेकदा शेतकऱ्यांच्या पीक संरक्षण खर्चापैकी जवळपास निम्मा खर्च याच रोगांवर होतो. बदलत्या हवामानामुळे आणि दीर्घकाळच्या आर्द्रतेमुळे रोगांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शेतकऱ्यांना अशा नाविन्यपूर्ण उपायांची आवश्यकता आहे जे शाश्वत शेती पद्धतींना पाठिंबा देताना विश्वसनीय आणि दीर्घकाळ टिकणारे संरक्षण प्रदान करतील.झिवाना स्मार्ट आपल्या आधुनिक कार्यपद्धतीने या आव्हानाला सामोरे जाते जी ऊमायसीट रोगांविरुद्ध सर्वोत्तम कामगिरी करते.

## भीती, विनोद आणि पराकोटीच्या नाट्याची खमंग फोडणी

**मुंबई :** वर्षातील सर्वात मोठ्या मराठी ब्लॉकबस्टर चित्रपटांपैकी एक ठरल्यानंतर, 'तुंबाडची मंजुळा' 7 ऑगस्ट रोजी मराठी झी 5 वर त्याच्या जागतिक डिजिटल प्रीमिअरसाठी सज्ज आहे. पोट धरून हसायला लावणारा भन्नाट विनोदी, अलौकिक वळणे आणि मुळाशी असलेले एक भावनिक कथाबीज अशी जमून आलेली भट्टी चित्रपटगृहातील प्रदर्शनादरम्यान समीक्षकांची प्रशंसा आणि प्रेक्षकांचे प्रेम या दोन्ही गोष्टी जिंकल्यानंतर मंचावर दाखल होणार आहे. विविध कोरगावकर दिग्दर्शित आणि झी स्टुडिओ निर्मित 'तुंबाडची मंजुळा'या चित्रपटात जितेंद्र जोशी, ओम भुतकर, मकरंद अनासपुरे, सई तम्हणकर आणि उषा नाडकर्णी यांच्या प्रमुख भूमिका आहेत केशव कोणालाही हानी न पोहोचवणारे खोटे बोलतो की त्याला मंजुळा नावाच्या महिलेच्या आत्म्याने झपाटले आहे. संपूर्ण गाव गोंधळात पडते. त्याचा अभिमान वाचवण्याचा प्रयत्न म्हणून जो खेळ सुरू होतो;

## लिम्फोमा कॅन्सरवर मात; 12 वर्षीय इशरत फातेमाची 15 दिवसांत प्रकृतीत सुधारणा

तभा वृत्तसेवा



**छत्रपती संभाजीनगर :** कॅन्सरचे वेळेवर निदान आणि योग्य उपचार मिळाल्यास गंभीर अवस्थेतील रुग्णालाही नवजीवन मिळू शकते, याचा प्रत्यय १२ वर्षीय इशरत फातेमा हिच्या उपचारातून आला आहे. लिम्फोमा (लसीका ग्रंथींचा कर्करोग) झालेल्या इशरतच्या छातीत मोठी गाठ निर्माण झाल्याने तिला श्वास घेण्यास तीव्र त्रास होत होता. प्रकृती गंभीर झाल्याने तिला डॉ. आय. जी. पटेल कॅन्सर फाऊंडेशन, सत्यविष्णू रुग्णालय, हडको येथे दाखल करण्यात आले.

डॉ. आय. जी. पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने सलग १५ दिवस अतिदक्षता विभागात उपचार केले. या काळात ऑक्सिजन, नॉन-इन्व्हेसिव्ह व्हेंटिलेशन (एनआयव्ही) तसेच आवश्यकतेनुसार व्हेंटिलेटरची मदत देण्यात आली. नियोजनबद्ध उपचार, अचूक निदान आणि सातत्यपूर्ण वैद्यकीय देखरेखीमुळे छातीतील गाठ पूर्णपणे नाहीशी झाली असून इशरतचा श्वासोच्छ्वास पूर्ववत झाला आहे. सध्या ती स्वतः चालणे, बोलणे, जेवणे व खेळणे अशी सर्व दैनंदिन कामे सहजपणे करत आहे.

डॉ. पटेल यांनी सांगितले की, शरीरात गाठी, दीर्घकाळ ताप, वजन कमी होणे किंवा श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे आढळल्यास त्वरित कर्करोगतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. वेळेवर निदान आणि योग्य उपचार हेच कर्करोगावर मात करण्याचे प्रभावी साधन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## मुंबईतील यशस्वी प्रयोगांनंतर; 'पाण्याने पेटला वणवा' नाटकाचा महाराष्ट्र दौरा



**छत्रपती संभाजीनगर :** मुंबईतील यशस्वी प्रयोगांनंतर युगंधर क्रिएशन्स एल.एल.पी. प्रस्तुत 'पाण्याने पेटला वणवा' हे ऐतिहासिक मराठी नाटक आता महाराष्ट्राच्या दौऱ्यावर निघाले आहे. ३ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत नाशिकसह धुळे, नंदुरबार, जळगाव, बुलढाणा, जालना, परभणी, बीड, औरंगाबाद आणि अहिल्यानगर येथे या नाटकाचे प्रयोग सादर होणार आहेत.

महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाच्या शतकोत्तर प्रवासाला अभिवादन करणारे हे नाटक सामाजिक न्याय, समानता आणि स्वाभिमानाच्या लढ्याची प्रेरणादायी कथा रंगभूमीवर जिवंत करते. २० मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेला चवदार तळे सत्याग्रह हा केवळ पाण्याचा अधिकार मिळविण्याचा संघर्ष नव्हता, तर मानवी प्रतिष्ठा आणि सामाजिक समतेसाठी उभारलेली ऐतिहासिक चळवळ होती. त्याच संघर्षाची

# रुक्मिणी ऑडिटोरियममध्ये 'स्वरराज-जय हरी विठ्ठल'ची भक्तिमय पर्वणी

## युवागायक रॉकस्टार स्वराज सरकटे यांच्या अफलातून सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** श्री महालक्ष्मी प्रतिष्ठानतर्फे श्रद्धेय स्व. डॉ. आत्मारामजी सरकटे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित आषाढी महोत्सवानिमित्त सादर करण्यात आलेल्या 'स्वरराज-जय हरी विठ्ठल' या संगीत मैफलीला यंदाही रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एमजीएम परिसरातील रुक्मिणी ऑडिटोरियम हाऊसफुल्ल झाले असून, संपूर्ण कार्यक्रमात वारंवार झालेल्या **'वन्समोअर'**च्या गजराने वातावरण भारावून गेले.

कार्यक्रमाची सुरुवात 'जय हरी विठ्ठल, जय जय विठ्ठल' या नामगजराने झाली. त्यानंतर सुप्रसिद्ध गायक-संगीतकार व 'स्वरराज'चे निर्माता प्रमोद सरकटे यांनी आपल्या दमदार आवाजात विठ्ठलनामाचा गजर आणि स्वतः संगीतबद्ध केलेल्या 'परब्रह्म' अल्बममधील हरिपाठ सादर करून भक्तिमय वातावरण निर्माण केले.

यानंतर युवा गायक रॉकस्टार स्वराज सरकटे यांनी पांडुरंग रंगुनिया, कानडा राजा, मनमंदिरा, पाऊले चालती पंढरीची वाट, राधे तुला, चल ग सखे, पंढरपुरात काय वाजत गाजत, माऊली माऊली आदी गीतांनी रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. प्रत्येक गीतानंतर प्रेक्षकांकडून वन्समोअरची जोरदार मागणी होत होती. सभागृहातील टाळ्या, जल्लोष आणि विठ्ठलनामाच्या गजरामुळे





जणू पंढरपूरच्या वारीचाच अनुभव उपस्थितांना मिळाला.

कार्यक्रमादरम्यान झालेल्या पावसानेही या भक्तिमय सोहळ्यात वेगळीच रंगत आणली. जणू वरुणराजानेही या संगीतमय वारीत सहभागी होत भक्तिरसात चिंब भिजण्याचा आनंद घेतला.

कार्यक्रमात माझे माहेर पंढरी, अवघे गरजे पंढरपूर तसेच उपशास्त्रीय संगीतावर आधारित मधुबन मे राधिका या रचनांनाही रसिकांनी भरभरून दाद दिली. गायिका मृदुला सोनजे यांनी रुणुझुणु रे व हरी म्हणा, तर बकुळ पाटील यांनी वृक्षवल्ली आम्हा सोयरे हे गीत सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढविली.

प्रा. डॉ. रवींद्र बनसोड आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांनी प्रभावी निरूपण केले, तर सूत्रसंचालन प्रशांत जोशी यांनी केले. दिलीप खंडेराय यांच्या दिंडीनेही उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

वाद्यसंगतीमध्ये बासरीवर गिरीश काळे, तबल्यावर सई बाराबोटे व कृष्णा चेन्ने, मृदंगावर विक्रम पवार, सिंथेसायझरवर राजू जगधने, ऑक्टोपॅडवर महेंद्र नरवडे व निखिल प्रधान यांनी प्रभावी साथ दिली. संदीप साऊंड यांची ध्वनी-प्रकाश व्यवस्था, भीकमचंद मल यांचे स्टेज व्यवस्थापन, रणजीत उरगुंडे यांनी एलईडी स्क्रीनवर उभे केलेले पंढरपूरचे देखणे दृश्य आणि विवेक यांची व्हिडिओ-छायाचित्रण सेवाही विशेष ठरली.

'स्वरराज-जय हरी विठ्ठल' संयोजन समितीचे सतीश ललवाणी, प्रशांत नरवडे, रवी शिंदे, मनीष महाजन, वैभव थोरात आदींनी उपस्थितांचे स्वागत केले. शेवटपर्यंत रसिकांनी सभागृहात ठाण मांडून गीतांच्या माध्यमातून पंढरीची अविस्मरणीय अनुभूती घेतली. यावेळी आषाढी महोत्सवानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. आमदार विलासराव भुमरे, महापौर समीर राजूरकर, सामाजिक कार्यकर्ते प्रवीण पारेख तसेच ह.भ.प. कीर्तनकार अनिल महाराज तुपे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

## 60 व्या वर्षी गडकिल्ल्यांच्या भ्रमंतीचे शतक, बजरंग काळे यांचा 'दुर्गप्रेमी' कडून सत्कार

तभा वृत्तसेवा

**पैठण दि ०३ :-** श्रीक्षेत्र वडवाळी येथील संस्कारी शेतकरी, कोठीवाले कुटुंबातील बजरंग रुस्तुम काळे यांनी नुकतेच शंभरावा 'गगनगड' रेंज ट्रेक पूर्ण केल्यानिमित्त 'दुर्गप्रेमी' संस्थेच्या वतीने बजरंग काळे यांचा सर्वश्री जगनाथ राऊत, संतोष बेडके, विवेक पाटील, दीपक भोसले, हरी साळुंके, सोपान बांगर यांच्या शुभहस्ते अभिनंदन आणि सत्कार करण्यात आला.

बजरंग काळे यांनी पैठण दुर्ग प्रतिष्ठान या संस्थेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या, स्वराज्याचे संरक्षक असणाऱ्या सह्याद्रीच्या कुशीतील तब्बल शंभर गडकिल्ले अभ्यास, भ्रमंती, परिसर स्वच्छता, वृक्षारोपण व संवर्धन केले.



या प्रसंगी विविध प्रकारची इतिहास व संस्कृती रक्षक अशी ध्येयं बाळगणाऱ्या ' सह्याद्रीचे सोबती, 'पैठण दुर्ग प्रतिष्ठाण', 'पर्यटन माझा महाराष्ट्र', 'दुर्गप्रेमी मंडळ', 'बा रायगड', 'हिंदवी परिवार' या संस्थांनी केलेल्या सततच्या मार्गर्शनाचा आणि प्रेरणेचा बजरंग काळे यांनी कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला.

इंग्रजी भाषा विषयाचे व्यासंगी शिक्षक म्हणून सेवानिवृत्त झालेल्या बजरंग काळे यांनी सततच दुर्ग भ्रमंती, दुर्ग संवर्धन आणि अभ्यास यामध्ये पैठण आणि छत्रपती संभाजीनगर येथील दुर्गप्रेमींच्या सहकाऱ्यांसह वयाच्या आपल्या साठाव्या वर्षी वनदुर्ग, जलदुर्ग, गिरीदुर्ग आणि स्थलदुर्ग या सर्व प्रकारातील भ्रमंती मोहिमा पूर्ण केल्या आहेत. दुर्गप्रेमींच्या मानसिक आणि शारीरिक क्षमतेचा कस लागणाऱ्या सह्याद्रीच्या उंचचउंच पर्वतरंगातील हे गडकिल्ले भ्रमंतीचे शतक पूर्ण करण्याच्या व्यासंगामध्ये आपणांस सुसंस्कृत मुख्यध्यापिका असलेली पत्नी सौ. जलकन्या बजरंग काळे हीने सातत्याने पाठिंबा दिला, प्रोत्साहन दिले. या सत्कार प्रसंगी सौ अनिता रामदास काळे, सौ. कविता एकनाथ काळे, सौ. संपदा ज्ञानेश काळे यांनी बजरंग काळे यांचे औक्षण करून अभिनंदन केले.

त्याचप्रमाणे पैठण येथील पत्रकार शिवाजी गाडे,डॉ. सुनील गायकवाड, प्राचार्य संतोष तांबे, प्रा. संतोष गव्हाणे, प्रा. महेश गोंडे पाटील, आबासाहेब जाधव, योगेश लोहारे,मिलींद रोडे, संतोष गोबरे पाटील, बाळू आहेर, विष्णू ससाणे, रामदास रामावत, ज्ञानेश्वर नवले,सुनील पायघन, रविंद्र काळे, प्रकाश सोनवणे, द्वारकादास निवारे, आदींसह अनेक शिवभक्तांनी गडकिल्ल्यांचे शतक पूर्ण केल्याबद्दल बजरंग काळे यांचे अभिनंदन केले आहे.

## शॉर्टसर्किटमुळे घराला आग, नगराध्यक्षा विद्याताई भूषण कावसानकर यांची घटनास्थळी भेट.

तभा वृत्तसेवा



**पैठण दि ०३ :-** पैठण शहरातील इंदिरानगर येथील कडुबाई भगवान घुंगासे व आशाताई घुंगासे यांच्या राहत्या घराला लाईटच्या शॉर्टसर्किटमुळे अचानक आग लागून घरातील सर्व जीवनावश्यक वस्तू व संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले.या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच नगराध्यक्षा विद्याताई भूषण कावसानकर यांनी घटनास्थळी स्वतः भेट देऊन पाहणी केली तसेच आशाताई व घुंगासे कुटुंबीयांना धीर दिला. आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली घुंगासे कुटुंबीयांना शक्य ती सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन नगराध्यक्षा विद्याताई भूषण कावसानकर यांनी यावेळी दिले. या कठीण प्रसंगी घुंगासे कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असून, त्यांना या संकटातून सावरण्या साठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे राष्ट्रीय रसायनशास्त्र दिन उत्साहात साजरा



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.३ ऑगस्ट :** अजिंठा एज्युकेशन सोसायटी संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील रसायनशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रीय रसायनशास्त्र दिन-२०२६ उत्साहपूर्ण वातावरणात महाविद्यालयाच्या सेमिनार हॉल येथे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे उपस्थित होते.कार्यक्रमाचे संसाधन व्यक्ती (Resource Person) म्हणून रसायनशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष पडघन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास डॉ.सुनील चौधरे,प्रा. रवींद्र जाधव तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.मनोजकुमार चोपडे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.पंकज गावित यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

आपल्या व्याख्यानात डॉ.पडघन यांनी रसायनशास्त्राचे दैनंदिन जीवनातील महत्त्व,आधुनिक संशोधन,हरित रसायनशास्त्र,औषधनिर्मिती,पर्यावरण संवर्धन तसेच रोजगार आणि उद्योजकतेच्या विविध संधी यांविषयी सविस्तर माहिती दिली.तसेच भारतातील महान वैज्ञानिक आचार्य प्रफुल्ल चंद्र रे यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेत विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचे आवाहन केले.अध्यक्षीय भाषणात डॉ.शिरीष पवार यांनी विद्यार्थ्यांनी विज्ञाननिष्ठ विचारसरणी स्वीकारून संशोधन क्षेत्रात कार्य करावे,असे प्रतिपादन केले.प्रमुख पाहुणे डॉ.रावसाहेब बारोटे यांनी राष्ट्रीय रसायनशास्त्र दिनाचे महत्त्व

## प्रवीण टाके छत्रपती संभाजीनगरच्या माहिती उपसंचालक पदावर रुजू

**छत्रपती संभाजीनगर दि.03 :** माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाचे उपसंचालक प्रवीण टाके यांनी सोमवारी छत्रपती संभाजीनगर विभागाचे माहिती उपसंचालक या पदाचा कार्यभार स्वीकारला.




प्रवीण टाके यापूर्वी कोल्हापूर येथे उपसंचालक म्हणून कार्यरत होते. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात २००८ ला रुजू झाल्यानंतर त्यांनी नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रात जनसंपर्क अधिकारी म्हणून काम केले आहे. त्यानंतर मुंबई मंत्रालयात वरिष्ठ सहायक संचालक असताना 'लोकराज्य'चे ते कार्यकारी संपादक होते. चंद्रपूर, नागपूर व नांदेड याठिकाणी त्यांनी जिल्हा माहिती अधिकारी पदावर कार्य केले आहे. शासन सेवेत केलेल्या उल्लेखनीय कामासाठी त्यांना सन २०१९ -२० वर्षाचा यशवंतराव चव्हाण उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे.

पत्रकारितेतील स्नातकोत्तर पदवी प्राप्त असलेले प्रवीण टाके यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा स्व.वसंतराव ओगले पुरस्कार प्राप्त आहे. शासनात येण्यापूर्वी त्यांनी जवळपास १४ वर्ष नागपूर पत्रिका, तरुण भारत, सामना आणि लोकमत वृत्तपत्रात विविध पदावर कार्य केले आहे. त्यांची फकीर ही चरित्र कादंबरी प्रकाशित झाली आहे. वऱ्हाडी भाषेतील स्तंभकार, कवी, लेखक म्हणून त्यांची ओळख असून विविध सामाजिक विषयावर त्यांनी विपुल लेखन केले आहे.

आज विभागीय माहिती कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी येथील जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने अधिकारी,कर्मचा-यांनी त्यांचे स्वागत केले.

## एमजीएमच्या विद्यार्थ्यांनी सर केला जीवधन किल्ला



**छत्रपती संभाजीनगर, दि.३ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियंत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेली दोन दिवसीय जीवधन किल्ला मोहीम यशस्वीपणे संपन्न झाली. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे आपला सहभाग नोंदविला होता. एमजीएम अडव्हेंचर स्पोर्ट्स क्लब आणि जेएनईसी राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**अशा मोहिमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निसर्ग जवळून अनुभवता येतो, स्वतः**तील नेतृत्व गुणांना चालना देता येते, पर्यावरणासंदर्भात जागृती, वैयक्तिक तसेच व्यक्तिमत्व विकास साधण्याची संधी मिळत असते. विद्यापीठ कायम अशा प्रकारचे उपक्रम राबवित आलेले आहे. या दोन दिवसीय मोहिमेत विद्यार्थ्यांनी कॅम्पिंग, ट्रेकिंग अशा विविध उपक्रमांमध्ये आपला उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

या मोहिमेत विद्यापीठाच्या वतीने एनएसएस समन्वयक डॉ.आर.आर.देशमुख, डॉ.सुधीर यादव, भानुप्रिया गायकवाड आदि प्राध्यापकांनी आपला सहभाग नोंदविला होता. विद्यापीठाचे अडव्हेंचर इंचार्ज डॉ.शशिकांत सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली या मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

हा उपक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, संचालक नितीन घोरपडे, विभागप्रमुख डॉ. दिनेश वंजारे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## लायन्स क्लब राहाता मार्फत वृक्षारोपण व सम्मान सोहळा

राहाता ( वार्ताहर) डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन श्रेयस दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली वन मंथ वन ग्लोबल कॉज नुसार ऑगस्ट महिन्यात एनवायरनमेंट बाबत उपक्रम करण्याबाबत सांगण्यात आले होते, त्या नुसार लायन्स क्लब राहाता यांनी ५ फुटी ५ नारळ व ५ आंबे ची मोठी झाडे चितळी रोड राहाता येथील चर्च मधे लावण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. संजय गायकवाड उपाध्यक्ष लायन्स क्लब राहाता यांनी केले. या प्रसंगी पत्रकार सतीश वैजापूरकर, राहता प्रेस क्लब चे अध्यक्ष रामभाऊ लोंढे, राष्ट्रपती





पुरस्कार विजेते सर्जेराव मते, राजेंद्र निकले, रवींद्र जोशी यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी प्रकाश सदाफळ, बाळासाहेब सोनवणे, संदीप वाव्हळ, मुन्नाभाई शाह, राजेंद्र बांगर, अंजली उबाळे, सरला तायडे, श्वेता कारले, स्मिता मुरादे,सविता काळे, सदाफळ ताई, उर्मिला हसे, डॉ मनाली उबाळे, रमेश निकळे, भारूड सर, घेगडमाळ सर उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष उमेश शेटे, सेक्रेटरी दिनेश कारले, ट्रेशरर खिजर शाह, संजय गायकवाड, प्रकाश सदाफळ, सोहन उबाळे, सुनील हसे, नवीन काळे, संजय वाघमारे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रम चे सूत्रसंचालन सोहन उबाळे व आभार प्रदर्शन सविता काळे यांनी केले. स्नेह भोजनानंतर कार्यक्रम यशश्वी रित्याने पार पडला.

त्यानंतर स्वर्गीय वसंतराव देशमुख जिल्हास्तरीय सामाजिक पत्रकारिता पुरस्कार, पत्रकर दिलीप खरात यांना मिळाला व तसेच डॉ संजय उबाळे यांना इंटरनेशनल डिस्ट्रिक्ट ३२३४ डी-२ मधील आउटस्टैंडिंग झोन चेअरमन व सामाजिक कामाबद्दल लायन्स क्लब राहाता यांनी दोघांच्या सन्मान मोठ्या थाटात साजरा केला.

## अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम उत्साहात

तभा वृत्तसेवा

**बिडकीन, दि २ ऑगस्ट :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त बिडकीन येथे विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. अभिवादन, प्रतिमापूजन, शासकीय कार्यालयांना भेट, अन्नदान तसेच भव्य मिरवणुकीद्वारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर येथे प्रतिमापूजन व अभिवादनाने झाली. त्यानंतर सकाळी ११ वाजता ग्रामीण रुग्णालय, पोलिस ठाणे, ग्रामपंचायत कार्यालयासह विविध शासकीय कार्यालयांमध्ये जाऊन



अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर नाथ निवासी अस्थिव्यंग व मुकबधिर विद्यालयात अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आला.सायंकाळी ६ वाजता बिडकीन शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. मिरवणुकीत नागरिक, युवक आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. प्रतिमापूजन व अभिवादन कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्य मनोज पेरे, सहायक पोलिस निरीक्षक निलेश शेळके, वैद्यकीय अधिकारी डॉ आस्मा शाईन,पंचायत समिती सदस्य अक्षय गवारे, सरपंच अशोक धर्मे, युवासेना प्रमुख काकासाहेब टेके, तमीजोद्दीन इनामदार, उपसरपंच किरण गुजर, मधुकर सोकटकर, अंकुश धर्मे, विकास गोर्डे, रमेश शिंदे, सागर फरताळे, रुतिक धर्मे, प्रविण चव्हाण, किशोर धर्मे, अनिल शिंदे, निसार इनामदार, आजम इनामदार,अली इनामदार उमेश गुजर, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अंकुश अवचिंदे, उपाध्यक्ष भरत मोघे, सचिव शाम पाटोळे, संदिप गायकवाड, जीवन मिसाळ, रविंद्र गायकवाड, राकेश गाढे, प्रविण गायकवाड, विठ्ठल आहेर, आदित्य घुले यांच्यासह बिडकीन व परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी बिडकीन पोलिस ठाण्याच्या वतीने कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सहायक फौजदार महादेव निकाळजे, पोलिस उपनिरीक्षक संभाजी झिंजुर्डे तसेच संदीप धनेधर, मगर, स्वप्निल दिलवाले आदी

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख

# पंतप्रधानांची दिलदारी...

देशात सध्या एका बाजूने वैचारिक तर दुसऱ्या बाजूने संवैधानिक पातळीवर लढाई सुरू आहे. सोशल मीडियाची विविध माध्यमे, सभा, आंदोलने, लघुबैठका आणि लेखनाच्या माध्यमातून सत्ताधाऱ्यांच्या बाजूने आणि विरोधात मते व्यक्त केली जात आहेत. खरं तर अशाप्रकारचे वातावरण हे जिवंत लोकशाहीचे लक्षण मानले पाहिजे. गेला जुलै महिना जंतरमंतरवरील आंदोलनाने गाजला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अभिजित दीपके या ३० वर्षीय युवकाने नीट पेपरफुटीच्याविरुद्ध २० जुलैपासून ठिय्या आंदोलन सुरू केले. सुदैवाने या आंदोलनाची सांगता सकारात्मक झाली. नीट पेपरफुटीच्या घटना भविष्यात घडू नयेत, यासाठी सरकारने कठोर कायदा आणला. पेपरफुटीवरून सुरू झालेला संघर्ष संसदेत संपुष्टात आला. पण, या आंदोलनात युवा वर्ग कशाप्रकारे विचार करतो, हे सुद्धा उघड झाले. आंदोलन करीत असताना भावनेच्या आहारी जाऊन म्हणा की अज्ञान म्हणा, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर खालच्या पातळीवर जाऊन असभ्य शब्दांत टीका करण्यात आली. शिवराळ भाषा वापरली गेली. यामध्ये मुलींचाही समावेश होता. उच्चभ्रू घरातील मुले, मुली जर अशा शिवराळ आणि गलिच्छ शब्दांचा वापर सार्वजनिकरीत्या करत असतील तर आजचा युवावर्ग कुठल्या दिशेने जात आहे, हे लक्षात येते. अर्थात, अशा युवक-युवतींची संख्या बोटावर मोजण्याइतकी असली तरी समस्त पालकांनी याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. कहर म्हणजे पंधरा-सोळा वर्षांच्या आसपास असलेल्या मुला-मुलींनी पंतप्रधान मोदी यांच्या दिवंगत मातेविषयी गलिच्छ शब्दांचा उपयोग केला. ते दुःखद आणि खेदजनक होते. कोवळ्या वयातील या आचरणाला मानसिक दृष्टिकोनातूनही पाहायला हवे.

मानसशास्त्रात सामाजिक अस्मिता सिद्धांत नावाची संकल्पना आहे. यामध्ये व्यक्ती स्वतःला एखाद्या गटाशी जोडून घेतो. मग हे गट भाषिक, धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय आधारावरील असू शकतात. अशाप्रकारच्या व्यक्ती आपली 'ओळख' त्या ज्या गटाशी, समूहाशी किंवा संस्थेशी जुळलेल्या असतात, त्यानुसार तयार करीत असतात. अशा वातावरणात आम्हीच श्रेष्ठ आणि योग्य असून बाकीचे चुकीचे आणि असमर्थ, असा द्विध्रुवीय कल तयार होत असतो. पण, ही परिस्थिती कायम राहत नसते. गट आणि संस्था बदलली तर कल आणि मानसिकताही बदलत असते. आता वातावरण निवळले आहे. भावनांचा उद्रेक शांत झाला आहे. ज्यांनी अभद्र भाषा वापरली, त्यांचे व्हिडीओ सोशल मीडियावर वेगात फिरत आहेत. आपण, कुठल्या शब्दांचा वापर देशातील सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तीबद्दल केला, हे आता त्यांच्या लक्षात येऊ लागले आहे. पंतप्रधानांनी त्यांना माफ केले आहे. खरे तर शिव्या देणारे युवक-युवती हे पंतप्रधान मोदी यांच्या वयाच्या आसपासही नाहीत. त्यांचे आई-वडीलही पंतप्रधानांपेक्षा वयाने लहान असावेत. जगातील सर्वांत मोठ्या लोकशाहीवादी देशाचे प्रमुख आणि १४० कोटी जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पंतप्रधानांबद्दल आपण बोलतो आहोत, याचे भान युवा पिढीला नसणे, ही चिंतेची बाब आहे. मोदींना शिव्या देणाऱ्या दिल्लीतील एका पंधरा वर्षांच्या मुलीने व्हिडीओ जारी करीत माफी मागितली आहे. स्वतःविषयी घृणा उत्पन्न होत असल्याचे आणि पश्चात्ताप होत असल्याचे तिने जाहीरपणे सांगितले. या सर्व घटनाक्रमाचा परिणाम केवळ त्या मुलीवरच नव्हे तर तिच्या कुटुंबावर आणि समाजावरही झाला असावा. कोवळ्या वयात चुका होत असतात. संवेदनशील मनाची माणसं जीवनभर पश्चात्ताप घेऊन जगत असतात. अशा भरकटलेल्या, मार्ग चुकलेल्या युवकांच्या मनाची अवस्था लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी रात्री व्हिडीओ संदेश जारी केला. पंतप्रधान म्हणून नव्हे तर कुटुंबातील व्यक्ती आणि वडिलकीच्या नात्याने चुकलेल्या मुला-मुलींना मार्गदर्शन करीत आपण त्यांना माफ करीत असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. जंतरमंतरवर आलेले सर्वच युवक-युवती आंदोलनासाठी आले, असे मुळीच नव्हते. काही फेरफटका मारण्यासाठी, सेल्फीसाठी आणि रील्स तयार करण्यासाठीही आले होते. तिथे जे वातावरण होते, त्यात ते वाहवत गेले आणि नकळत त्यांच्या तोंडून शिव्या बाहेर पडल्या असाव्यात. कधी कधी हा विषय संस्कारांचाही असतो. मुलांना घरातून, समाजातून जे संस्कार मिळत असतात, त्यानुसार त्यांचे आचार-विचार घडत असतात. कोवळ्या वयातील आपल्या मुली जर इतक्या असभ्य शब्द आणि भाषेचा उपयोग सार्वजनिकरीत्या करीत असतील तर हा आपल्या सर्वांसाठी एक सांस्कृतिक धक्का आहे. पण, या मुला-मुलींविरोधात कायदेशीर कारवाई करून प्रश्न सुटणार नाही; या भरकटलेल्या युवांना योग्य मार्ग दाखविणे आणि मार्गदर्शन करणे आपले कर्तव्य आहे. जी आई आज या जगात नाही, तिच्याबद्दल हीन भाषा वापरल्याने मला अतीव दुःख झाले. पण, त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई केल्याने प्रश्न सुटणार नाहीत. त्यांना न्यायालयाच्या फेऱ्या मारायला लावणे योग्य नाही. मी तर माफ केले आहेच; पण समाजानेही त्यांना समजून घेत माफी द्यायला हवी, असे आवाहन पंतप्रधानांनी केले. मोदीजींच्या मातेविषयी अपशब्द उच्चारण्याची ही काही पहिली घटना नाही. बिहार विधानसभा निवडणुकीच्या काळात काँग्रेसच्या कार्यकर्त्याने राष्ट्रीय जनता दलाच्या मंचावरून पंतप्रधानांच्या मातेला शिवीगाळ केली होती. यावरून विरोधकांच्या मनात पंतप्रधान मोदी यांच्याविषयी किती वैयक्तिक द्वेष आहे आणि मनात विष भरलेले आहे, हे दिसून येते. प्रत्येक निवडणुकीत मोदींवर वैयक्तिक पातळीवर टीका केली जाते. तरीही उमदेपणा दाखवीत पंतप्रधान मोदी यांनी युवकांना माफ करण्याचे आणि त्यांना मार्गदर्शन करण्याचे जे पाऊल उचलले, त्याचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. एरवी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सातत्याने विरोध करणारे अखिल भारतीय इमाम संघटनेचे अध्यक्ष मौलाना साजिद राशिदी यांनीही व्हिडीओ जारी करीत पंतप्रधानांचे तोंड भरून कौतुक केले. देशाचा प्रमुख म्हणून चुकलेल्या मुलांना माफ करण्याचे आणि त्यांना योग्य सल्ला देण्याचे अपेक्षित काम पंतप्रधान मोदी यांनी केले आहे. जंतरमंतरवर आलेले सर्वच युवक हे चुकीचे असतील असे नाही. यातील बहुतांश आपल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी आंदोलन करीत होते. आंदोलन बदनाम करण्यासाठी काही असामाजिक तत्त्वे आणि कुरापती लोक जंतरमंतरवर आलेही असतील. अशावेळी सरसकट सर्वांविरुद्ध कारवाई केली जाणार नाही, याची दक्षता सरकारने घेतली आहे. शांततेने आंदोलन करणाऱ्या युवकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात येणार नसल्याचे गृह मंत्रालयाने स्पष्टही केले. चुकले जरी असतील तरी ही मुलं आपलीच आहेत. त्यांना सुधारण्याची संधी देणे हे संवेदनशील सरकारचे कर्तव्य आहे.

मोदी यांनी युवकांबाबत जे पाऊल उचलले, त्यावर विरोधकांनी राजकारण सुरू केले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधानांनी जारी केलेल्या व्हिडीओची खिल्ली उडविली. मोदी यांनीच विद्यार्थ्यांची माफी मागावी, असे हास्यास्पद विधान केले. मोदीद्वेषाने पछाडलेल्या राहुल गांधी यांच्याकडून चांगल्या गोष्टीची अपेक्षा केली जाऊ शकत नाही. सरकारने त्यांच्याकडे लक्ष न देता असेच सकारात्मक काम सुरू ठेवले पाहिजे. पंतप्रधानांनी दिलदारी दाखवून नव्या पिढीला समजून घेतले. आता नव्या पिढीनेही देशाच्या, समाजाच्या आणि संस्कृतीच्या दृष्टीने आपल्या जबाबदाऱ्या समजून वर्तन केले पाहिजे. त्यातच त्यांचे आणि देशाचे भले आहे. ■

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# कॉक्रोच जनता पार्टी!

कॉक्रोच जनता पार्टी प्रथम स्थापन झाली आणि नंतर या पक्षाने एक आंदोलन करीत ते यशस्वीरीत्या तडीस नेले. आता या पक्षाच्या भवितव्याबाबत वेगवेगळी चर्चा सुरू असून वेगवगळे कयासही व्यक्त केले जात आहेत.

साधारणतः राजकीय पक्षाचा जन्म दोन प्रकारे होत असतो. विचारांच्या मंथनातून आणि एखाद्या आंदोलनातून. एखादा विचार घेऊन स्थापन होणारे पक्ष टिकतात आणि आंदोलनातून स्थापन होणारे पक्ष काळाच्या ओघात अस्तंगत होतात असा एक इतिहास आहे. काँग्रेस पक्ष स्वातंत्र्याच्या विचारातून स्थापन झाला. हा पक्ष आजही अस्तित्वात आहे. प्रथम जनसंघ व नंतर भाजप याची स्थापना एका विचारातून झाली. तो पक्ष आज केंद्रात सत्तारूढ आहे. याउलट आणिबाणीच्या विरोधात स्थापन झालेली जनता पार्टी केव्हाच खंडित आणि विसर्जित झाली.

आंदोलनातून राजकीय पक्ष जन्मास येण्याचे मागील उदाहरण म्हणजे अण्णा हजारे आंदोलनातून जन्मास आलेली आम आदमी पार्टी! अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखाली या पक्षाने दिल्लीवासीयांची मने जिंकली आणि नंतर मतेही जिंकली. प्रथम दिल्लीत व नंतर पंजाब या दोन राज्यांत या पक्षाला सत्ता मिळाली. मात्र, इतर राज्यांमध्ये या पक्षाला आपले पाय रोवता आले नाहीत आणि आता तर दिल्लीची सत्ता गमावल्यानंतर पंजाबची सत्ताही पुढील वर्षी होणाऱ्या निवडणुकीत पक्षाला गमवावी लागेल अशी चिन्हे आहेत.

आम आदमी पक्षालाही युवकांचा मोठा पाठिंबा मिळाला होता. दिल्लीचा युवा वर्ग या पक्षाचा जणू भक्त झाला होता. पण, ती स्थिती फार काळ टिकली नाही. अन्य राज्यांत या पक्षाला आपले हात-पाय पसरता आले नाहीत. आता तर आम आदमी पक्षाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह लागले आहे.

**एक योगायोग :** जनता पार्टी, आम आदमी पार्टी व कॉक्रोच जनता पार्टी या तिन्ही पक्षांच्या स्थापनेपूर्वी झालेल्या आंदोलनात युवक आघाडीवर होते. पण ना जनता पार्टीला आपले अस्तित्व टिकविता आले ना आम आदमी पक्षाला दिल्ली- पंजाबबाहेर आपला जम बसविता आला. या साऱ्या पृष्ठभूमीवर कॉक्रोच जनता पार्टीचे भवितव्य काय असेल यावर चर्चा सुरू झाली आहे. यातील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे या पक्षाच्या नेत्यांनी अद्याप तरी राजकारणात येण्याचे संकेत दिलेले नाहीत. पण, राजकारणाचा मोह एवढा अनावर असतो की येणाऱ्या काळात हा पक्ष निवडणुकीच्या मैदानात उतरलेला दिसेल आणि तेव्हा या पक्षाची खरी कसोटी लागलेली दिसेल.

**आंदोलन आणि पक्ष :** एखादे जनआंदोलन चालविणे आणि पक्ष चालविणे यात फार मोठे अंतर असते. 'नीट' परीक्षेचा पेपर फुटला. पेपरफूट ही देशातील काही नवी घटना नाही. पण, यावेळी २० 'नीट' इच्छुकांनी आत्महत्या केली. ही एक आगळी घटना होती. त्याची दखल घेतली जाणे आवश्यक होते. ती घेतली न गेल्याने विद्यार्थी वर्गात एक अस्वस्थता होती आणि त्यात सरन्यायाधीशांच्या एका विधानाने ठिणगीचे काम केले. सरन्यायाधीश न्या. सूर्य कांत यांनी आपल्या या विधानाचा विपर्यास झाल्याचे म्हटले असले तरी त्याचा व्हायचा तो परिणाम झाला आणि कॉक्रोच जनता पार्टीचा जन्म झाला. या पक्षाने देशाचे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली. ती वाढत गेली आणि अखेर सरकारला प्रधान यांचा राजीनामा घ्यावा लागला.

कॉक्रोच जनता पार्टीला मिळालेल्या या यशाने स्वाभाविकच या पक्षाचे नेते हूरळून गेले आहेत आणि नवनव्या घोषणा ऐकू येऊ लागल्या आहेत. पुढील क्रमांक यांचा वा त्यांचा अशी चर्चाही सुरू झाली आहे. या नव्या पक्षाला खरोखरीच असे यश मिळत जाईल काय? या प्रश्नाचे उत्तर देणे तसे अवघड आहे. कारण, 'नीट'ची परीक्षा हा विद्यार्थ्यांसाठी जिव्हाळ्याचा आणि भवितव्याचा प्रश्न होता. या मुख्य कारणासाठी आंदोलनाला सक्रिय पाठिंबा मिळाला. आता अन्य विषयांवरही या पक्षाने आंदोलन सुरू केल्यास त्यास तेवढाच पाठिंबा मिळेल असे मानणे चुकीचे ठरेल. मग या पक्षाला राजकीय पक्षाचे स्वरूप आलेले असेल आणि राजकीय स्वरूप-रूप आल्यानंतर या नव्या पक्षाला आपले अस्तित्व टिकविणे तेवढे सोपे जाणार नाही. आज देशातील विरोधी पक्ष कॉक्रोच जनता पार्टीला पाठिंबा देत आहेत. पण एकदा या पक्षाने आपली राजकीय महत्त्वाकांक्षा उघड केली की मग आज या पक्षाला पाठिंबा देणारे राजकीय पक्ष आपल्या भूमिका बदलण्यास वेळ लावणार नाहीत.

**सर्वांत मोठा प्रश्न :** कॉक्रोच जनता पार्टीच्या नेत्यांसमोरील सर्वांत मोठा प्रश्न हा राहणार आहे- देशाच्या राजकारणात एक दबावगट म्हणून काम करावयाचे, विद्यार्थ्यांच्या मुद्यांपुरते स्वतःला मर्यादित ठेवायचे की राजकीय पक्ष स्थापन करून राजकारणात उडी मारावयाची. कॉक्रोच नेत्यांसमोर हे तीन पर्याय राहणार असून त्यातून एकाची निवड करणे पक्षासाठी सोपे काम राहणार नाही. कारण जनभावनांवर आधारलेला राजकीय पक्ष फार काळ टिकत नाही असा आजवरचा अनुभव आहे. राजकीय पक्ष स्थापन करून, तो चालविणे ही काही सोपी बाब नाही. कारण, राजकारण आले की पैसा आला आणि मग पैसा आणण्यासाठी वेगवेगळे मार्ग आले. कॉक्रोच जनता पार्टीने हे सुरू केले की त्या पक्षातही समस्या येणार आणि सत्तासंघर्ष सुरू होणार. आणि मग अन्य राजकीय पक्ष व कॉक्रोच जनता पार्टी यात काहीही फरक राहणार नाही. आम आदमी पार्टी हे त्याचे उदाहरण आहे. दिल्लीत आम आदमी पार्टीने काही चांगली कामे केलीत. पण भ्रष्टाचाराच्या दलदलीत हा पक्षही फसला.

**युवा नेतृत्व :** कॉक्रोच जनता पार्टीच्या काही युवा नेत्यांची नावे चर्चेत आहेत. राजकारण, त्यातील डावपेच हे सारे त्यांच्यासाठी नवे राहणार आहे आणि यात दिल्लीचे राजकारण? ते तर भल्याभल्यांना पेलवले नाही. जम्मू-काश्मीरचे एक नेते, माजी मुख्यमंत्री शेख अब्दुल्ला यांनी 'आतिष-ए-चिनार' या शीर्षकाने आपले आत्मचरित्र लिहिले. त्यात त्यांचे एक मार्मिक विधान आहे. ते लिहितात - ''मी माझ्या मुलाला- डॉ. फारुख अब्दुल्ला यांना मुख्यमंत्रिपदाची खुर्ची तर दिली. पण, माझा अनुभव त्याला देऊ शकलो नाही. कारण, अनुभव ही अशी एक बाब आहे की ती देता येत नाही, ती मिळवावी लागते.''

**लांब रस्ता... :** कॉक्रोच जनता पार्टीला एक यश मिळाले आहे. पण, हे यश एक पक्ष म्हणून नाही तर एक आंदोलन म्हणून मिळाले आहे. यात त्यांना अन्य विरोधी पक्षांचा पाठिंबा होता. आता या संघटनेचे युवा नेते कोणता निर्णय घेतात यावर त्यांच्या आंदोलनाचे, संघटनेचे आणि स्वतः त्यांचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

देशभरातील विद्यार्थ्यांनी त्यांना भरघोस पाठिंबा दिला असला तरी देश चालविण्याएवढा अनुभव त्यांच्याजवळ नाही. आणि अनुभव ही अशी एक बाब आहे ही जी एका आंदोलनातून वा एका निवडणुकीतून मिळत नाही. १९८४ च्या निवडणुकीत राजीव गांधींना ४१३ खासदारांचे अभूतपूर्व यश मिळाले. पण, सरकार चालविण्याचा अनुभव त्यांच्याजवळ नव्हता. परिणामी १९८९ च्या निवडणुकीत काँग्रेसची सत्ता गेली.

एका केंद्रीय मंत्र्याचा राजीनामा मिळविण्यात यश आल्यानंतर, कॉक्रोच पार्टीच्या नेत्यांनी दिल्लीच्या एका पंचतारांकित हॉटेलमध्ये केलेली 'पार्टी' हा या पक्षासाठी शुभशकुन मानला जात नाही. पराजय पचविण्यासाठी जशी एक ताकद लागते, त्याहून अधिक ताकद व परिपक्वता विजय पचविण्यासाठी लागते. अर्थात हे सारे अनुभवातून कॉक्रोच पक्षाच्या लक्षात येईल आणि अनुभव मिळविण्याचा कोणताही 'शॉर्ट कट' नसतो. ■

## वेध


हेमंत सालोडकर

# क्रीडा खेळाडू आणि आंदोलनकारी युवक

भारतीय समाजात युवक ही देशाची सर्वांत मोठी शक्ती आहे. या शक्तीचा उपयोग राष्ट्रनिर्मितीसाठी होऊ शकतो, तसेच चुकीच्या दिशेने वळल्यास समाजात अस्थिरताही निर्माण होऊ शकते. आजच्या काळात एकीकडे भारतीय खेळाडू जागतिक स्तरावर देशाचे नाव उज्ज्वल करत आहेत, तर दुसरीकडे काही आंदोलनकारी युवक भावनेच्या भरात हिंसक मार्ग स्वीकारून समाजात अराजकतेचे वातावरण निर्माण करताना दिसतात. या दोन्हीमधील विरोधाभास विचार करायला लावणारा आहे.

प्राचीन भारतीय शिक्षणपद्धतीत शिष्यांना वेद, शस्त्र, शास्त्र, युद्ध आणि क्रीडा यांचे सर्वांगीण शिक्षण दिले जात असे. त्यामुळे व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होत असे. सर्वच जण सर्व विद्यांमध्ये पारंगत होत होते. कालांतराने शिक्षणपद्धतीत बदल झाले आणि विविध शाखांमध्ये स्वतंत्र तज्ज्ञ तयार होऊ लागले. डॉक्टर, अभियंते, शास्त्रज्ञ आणि प्रशासकीय अधिकारी घडले. याकडे सर्वांचाच कल वाढत गेला. आर्थिक सुबत्ता मिळविण्यास याचा उपयोग होऊ लागला. पण यात एका क्षेत्राकडे फारसे लक्ष गेले नाही. ते म्हणजे क्रीडा क्षेत्र. या क्षेत्राकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले गेले नाही. पाहिले गेले असले तरी मुलांचाच सहभाग त्यात जास्त होता. भारतात तर क्रिकेटलाच महत्त्व होते. त्यातही मुलांचा वरचष्मा होता. मुलींचा कल क्रीडाकडे फारसा नव्हता. त्याला पालकांचा निराशावादी दृष्टिकोनही कारणीभूत असेल. मुलींनी केवळ परंपरागत शिक्षण घ्यावे, घर सांभाळावे हीच मानसिकता कारणीभूत आहे. दुसरा म्हणजे क्रीडा हा केवळ छंद आहे. त्यातून काय साध्य होणार अशीही विचारधारा आणि मानसिकता समाजात रुजली होती.

मात्र गेल्या काही वर्षांत परिस्थितीत सकारात्मक बदल झाला आहे. ऑलिम्पिक, राष्ट्रकुल स्पर्धा, आशियाई क्रीडा स्पर्धा, खेलो इंडियासारखे उपक्रम आणि विविध राष्ट्रीय स्पर्धांमुळे क्रीडा संस्कृतीला मोठी चालना मिळाली. त्यातही राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, राष्ट्रीय स्तरावरील खेल कूद, विद्यापीठस्तरीय स्पर्धा मोठ्या प्रमाणावर होत आहेत. यात मुलांसोबतच मुलींचाही सहभाग लक्षणीय वाढत आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी क्रीडा सुविधांमध्ये वाढ केली, प्रशिक्षणासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून दिली आणि ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंना संधी दिली. त्यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यातील युवक-युवती आत्मविश्वासाने क्रीडा क्षेत्रात पुढे येऊ लागले. महिला खेळाडूंच्या यशाने तर भारतीय क्रीडाक्षेत्राला नवी दिशा मिळाली आहे. महिला क्रिकेटपटू, बॉक्सिंग, कुस्ती, बॅडमिंटन, नेमबाजी, ॲथ्लेटिक्स आणि हॉकीमधील खेळाडूंनी जागतिक स्तरावर उल्लेखनीय यश मिळवले. त्यामुळे पालकांचा दृष्टिकोन बदलला असून मुलींनाही क्रीडा क्षेत्रात करीअर करण्यासाठी प्रोत्साहन मिळत आहे. वनवासी भागातील अनेक युवक-युवती आपल्या जिद्दीच्या बळावर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकत आहेत. त्यांच्या यशामुळे देशाचा गौरव वाढत आहे.



खेळाडूंचा यशाचा झेंडा फडकत असताना याच्या उलट, काही आंदोलनकारी युवक आपल्या मागण्यांसाठी शांततामय आणि लोकशाही मार्गाऐवजी हिंसक किंवा आक्रमक पद्धतीचा अवलंब करत आहेत. सार्वजनिक मालमत्तेची हानी, दगडफेक किंवा समाजात तेढ निर्माण करणारी वक्तव्ये यामुळे सामान्य नागरिकांचे मोठे नुकसान होते. आंदोलन हा लोकशाहीतील महत्त्वाचा अधिकार असला तरी त्यामध्ये संयम, शिस्त आणि सामाजिक जबाबदारी यांचे भान राखणे तितकेच आवश्यक आहे. अन्यथा आंदोलनाचा मूळ उद्देशच बाजूला पडतो आणि समाजात असंतोष वाढतो. क्रीडापटूंच्या आयुष्यात शिस्त, कठोर परिश्रम, संघभावना, संयम आणि राष्ट्राभिमान यांना अत्यंत महत्त्व असते. विजय मिळाला तरी नम्रता आणि पराभव आला तरी चिकाटी हे त्यांचे वैशिष्ट्य असते. आपल्या वर्तनातून आणि कर्तृत्वातून ते समाजाला सकारात्मक संदेश देतात. त्यामुळे त्यांचे यश हे केवळ पदकांपुरते मर्यादित राहत नाही, तर ते संपूर्ण युवा पिढीसाठी प्रेरणादायी ठरते. एकीकडे पदकांची लयलूट करणारे भारतीय तरुण खेळाडू आहेत, तर दुसरीकडे विनाकारण आंदोलन करत सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणारे युवक आहेत. पदक पटकावून देशाचा नावलौकिक करणाऱ्या खेळाडूंचा आदर्श आंदोलक तरुणांनी घ्यावा आणि राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे. ■

९८५०७५३२८१

## कानोसा

अमोल पुसदकर

# लोकमान्य टिळक आणि डॉ. हेडगेवार

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळविणारच, अशी धीरगंभीर गर्जना करणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे अनेक देशभक्तांचे, क्रांतिकारकांचे आदर्श होते. ज्या डॉ. हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली, ते सुद्धा लोकमान्य टिळकांचा खूपच आदर करीत होते. त्यांच्या विचारांचा डॉ. हेडगेवार यांच्यावर फार मोठा परिणाम होता. लोकमान्य टिळकांनी स्वराज्य प्राप्तीचा जो मार्ग दाखविलेला होता त्या मार्गावरही डॉक्टरांनी मार्गक्रमण केलेले होते. लोकमान्य टिळकांनी राष्ट्रकार्य करण्यासाठी चांगल्या लोकांची कमतरता आहे असे बोलून दाखवलेले होते. डॉ. हेडगेवार यांनी राष्ट्रकार्य करण्यासाठीच लोकांना संस्कारित, संघटित करण्याचे कार्य आजीवन केले. लोकमान्य टिळकांच्या विचारांचा प्रभाव डॉक्टरांवर असल्यामुळे तशाच पद्धतीच्या विचारांचे आचारांचे प्रदर्शन डॉक्टरांच्याही जीवनात झालेले आपल्याला दिसून येते. १ ऑगस्ट १९२० या दिवशी लोकमान्य टिळकांचे भौतिक जगातील कार्य पूर्ण झाले. एक ऑगस्टची त्यांची पुण्यतिथी आहे. संघाचे सुद्धा हे शताब्दी वर्ष आहे. या निमित्ताने लोकमान्य टिळकांचे व डॉ. हेडगेवार यांचे स्मरण आपसूकच होते.

१९०४ च्या जुलै महिन्यात लोकमान्य टिळक श्री शंकराचार्यांना भेटायला संकेश्वर पीठ येथे गेले. तेथे त्यांच्या शंकराचार्यांशी गप्पा चालू असताना लोकमान्य टिळक त्यांना म्हणाले की, आजकालच्या सुशिक्षित तरुणांना आमच्या धर्म आणि संस्कृती याबद्दल काहीही प्रेम राहिलेले नाही. त्यामुळे असे वाटते की जर यांना आमचा धर्म व संस्कृती नको असेल तर मग स्वराज्य झाले काय आणि परकीय ख्रिस्ती लोकांचे राज्य इथे राहिले काय दोन्ही सारखेच आहे. आपला धर्म, संस्कृती, परंपरा या टिकविण्यासाठीच आम्ही स्वराज्याची धडपड करत आहोत. परंतु लोकांना स्वराज्य पाहिजे आहे पण या गोष्टी पाहिजे नाही हे बरोबर नाही.

एका ठिकाणी डॉक्टरांनी सुद्धा अशाच पद्धतीचे विचार व्यक्त केलेले होते. वर्धा जिल्ह्यातील अल्लीपूर या गावी झालेल्या संघाच्या शिबिरामध्ये स्वयंसेवकांसमोर बोलताना डॉक्टर म्हणतात की, पूर्वीचा गांधार आज अफगाणिस्तान झालेला आपण पाहत आहोत. आजचा हिंदुस्तान भविष्यकाळात इस्लामी स्थान होईल की काय, अशी भीती आज वाटत आहे. धर्म आणि संस्कृती याचे मोल देऊन स्वराज्य घ्या, असे जर कोणी म्हणाले तर असे संस्कृतीविहीन स्वराज्य घेण्यात काय अर्थ आहे, याचा तुम्ही विचार करा. यावरून आपल्या लक्षात येते की लोकमान्यांच्या विचारांचा डॉ. हेडगेवार यांच्यावर कसा प्रभाव होता. १९१८ मध्ये लोकमान्य टिळक भुसावळला गेले होते. तेथे श्री दास्ताने वकील व त्यांचे स्नेही केळकर लोकमान्य टिळकांना म्हणाले की, तुमची स्वराज्याची चळवळ इतके वर्ष झाले सुरू आहे परंतु तिला यश येत नाही. कारण मला असे वाटते की तुमच्या चळवळीला ईश्वराचे अधिष्ठान नाही. त्यावर लोकमान्य टिळक त्यांना म्हणाले की, ईश्वराचे अधिष्ठान तुम्ही कशाला म्हणता. त्यावर केळकर त्यांना म्हणाले की, तुम्ही तुमच्या यशासाठी काही पूजा अर्चा करता का? त्यावर लोकमान्य त्यांना म्हणाले की, फक्त पूजाअर्चा करणे म्हणजे ईश्वराचे अधिष्ठान आहे असे नाही. तर माझी प्रत्येक चळवळ ही ईश्वरी कार्यच आहे. मी हे जे स्वराज्याचे काम करतो आहे ही ईश्वराची आराधना म्हणूनच करतो आहे. लोकमान्य म्हणाले की, भगवंताचं काम काय आहे. सज्जनांचे रक्षण, दुर्जनांचे निर्दालन आणि धर्मसंस्थापना. माझी स्वराज्याची चळवळ यासाठीच आहे. संघकार्य हे ईश्वरी कार्य आहे अशीच डॉ. हेडगेवार यांची सुद्धा श्रद्धा होती. संघाच्या प्रार्थनेमध्ये सुद्धा 'विधायास्य धर्मस्य संरक्षणम्' असे म्हटलेले आहे. आम्ही जे काम करतो आहे ते काम धर्माचे संरक्षण करूनच आम्हाला करायचे आहे हा भाव स्वयंसेवकांमध्ये स्पष्ट असतो.

लोकमान्य टिळकांच्या ६१ व्या वाढदिवसाच्या दिवशी लोकांनी त्यांना अहेर समर्पण केला. त्या वेळेला टिळक त्यांना म्हणाले, हा अहेर मला करण्यापेक्षा माझं काम चालवायला मला काही माणसं तुम्ही द्या. असेच त्यांना पुढे काही लोक म्हणाले की, तुम्ही आता विश्रांती का घेत नाही. त्यावर टिळक म्हणाले की, विश्रांती कसा आणि केव्हा घेऊ. माझ्या कार्याला चालवणारे लोक समोर आले पाहिजेत. हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत या देहामध्ये प्राण असेपर्यंत मला हे कार्य करावेच लागेल.

डॉ. हेडगेवार यांनी नागपूरला संघाची स्थापना केली. लोकमान्य टिळकांना जी खंत होती ती खंत डॉ. हेडगेवार यांनी दूर केली व आज राष्ट्रकार्य करायला देशामध्ये लाखो स्वयंसेवक तयार झालेले आहेत. कलकत्त्यामध्ये वैद्यकीय शिक्षण घेत असताना सुद्धा डॉ. हेडगेवार गणेशोत्सवांचे आयोजन विविध मंडळांमध्ये कसे करता येईल यासाठी प्रयत्न करत असायचे. लोकमान्य टिळकांचे दर्शन घेण्यासाठी पुण्याला जावे असा विचार डॉ. हेडगेवार यांच्या मनामध्ये आला व ते लोकमान्य टिळकांना भेटायला पुण्याला गायकवाड वाड्यात गेले. टिळकांनी त्यांच्या राहण्या-खाण्यापिण्याची व्यवस्था आपल्याच घरी करून घेतली. परंतु एवढ्या मोठ्या पुढाऱ्याच्या हातून आपली सेवा होत आहे हे बरोबर न वाटल्यामुळे दोन दिवसांनंतर डॉ. हेडगेवार, मला शिवनेरी बघायला जायचे आहे, म्हणून त्यांच्या घरून निघून गेले. लोकमान्य टिळकांचे व्यक्तिनिर्माणाचे, राष्ट्र निर्माणाचे स्वातंत्र्य चिरकाळ कसे टिकेल याचे चिंतन डॉ. हेडगेवार यांच्या जीवनामध्ये पुढे आपल्याला दिसून येते. टिळकांच्या निधनानंतर पुढील वीस वर्षांत डॉक्टरांनी संघाचे काम संपूर्ण भारतात पसरविले. आज या दोन्ही महान विभूती आपल्यामध्ये नाहीत. परंतु लोकमान्य यांचे विचार आजही आपल्याला मार्गदर्शन करतात तर त्या विचारांवर चालणारी माणसे, ती माणसे निर्माण करणारी कार्यपद्धती, जी डॉ. हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रूपाने निर्माण केलेली आहे ती आजही कायम आहे. लोकमान्यांचे विचार व डॉक्टरांनी उभी केलेली कार्यपद्धती, संघटना ही नेहमीच भारतीयांना राष्ट्रकार्य करण्याची प्रेरणा देत राहील असे वाटते. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### भरकटलेले युवक आणि उमदे पंतप्रधान

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जेन झी युवकांना एका व्हिडीओद्वारे संदेश देऊन, नुकत्याच झालेल्या आंदोलनादरम्यान काही उपद्रवी युवक-युवतींनी पंतप्रधान व त्यांच्या दिवंगत मातोश्रींबद्दल जे अपशब्द वापरले त्याबद्दल त्यांना योग्य दिशा दाखवण्याची आवश्यक असल्याचे प्रतिपादन करून माफ केले आहे. आंदोलनादरम्यान काहींनी अतिशय लांच्छनास्पद वर्तन करून जो उच्छाद मांडला तो खरोखरच घृणास्पद होता. हे वर्तन पाहिल्यावर आपण सभ्य समाजात खरेच वावरतो आहोत का हा प्रश्न पडतो. आपण नवीन पिढीला संस्कारक्षम करण्याची आवश्यकता आहे हे कितीही ठरवले तरी सात्त्विकता, नैतिकता आणि सामाजिक मूल्यांचा ऱ्हास होत असल्याचे चित्र विदारक आहे. उपद्रवींना एक प्रकारे माफ करून पंतप्रधानांच्या संत प्रवृत्तीचे दर्शन आणि मनाचा मोठेपणा दिसला.

**राम राजे**/९४२१७७९९४५

■■

### नर्मदा नदीचे पाणी महाराष्ट्रासाठी सुखदच!

नुकतेच दोन दशकांपासून चिघळलेला नर्मदा नदीच्या पाणी वाटपाचा वाद सुटला आहे. ही बाब महाराष्ट्राच्या दृष्टीने समाधानकारक मानली जात आहे. कारण त्यामुळे आता राज्याच्या खान्देश विभागातील नंदुरबार, जळगाव आणि धुळे जिल्ह्यातील पाणीप्रश्न सुटणार आहे. गुजरात राज्यामधील नर्मदा नदीवर बांधण्यात आलेला नर्मदा प्रकल्प पूर्ण होऊन इतर राज्यांनी त्या प्रकल्पातील पाण्याचा वापरदेखील सुरू केला आहे. पण महाराष्ट्राच्या वाट्याला मात्र आजपर्यंत या प्रकल्पाचे थेंबभर पाणीदेखील आले नव्हते. आता पाणीवाटपाचा वाद दिल्लीत झालेल्या बैठकीत सुटल्यामुळे महाराष्ट्र राज्याला दहा अब्ज घनफूट पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नर्मदा प्रकल्पाशी संबंधित महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थान या चार राज्यांच्या संमतीने वादावर तोडगा मान्य करण्यात आला. कारण चारही राज्यांमध्ये भाजपचेच सरकार असल्यामुळे नर्मदा पाणी वाटपाचा वाद सुटण्यास योग्य आणि सकारात्मक दिशा मिळाली.



याअगोदर महाराष्ट्राने या प्रकल्पाचे पाणी तापी खोऱ्यात वळवण्याचा प्रस्ताव ठेवला होता. परंतु, एका नदी खोऱ्यातून दुसऱ्या नदी खोऱ्यात पाणी वळवता येत नसल्याच्या नियमावर बोट ठेवून गुजरात आणि मध्य प्रदेशने विरोध केला होता. तो तिढा आता सुटल्यामुळे उत्तर महाराष्ट्रातील दुर्गम आणि दुष्काळी भागाला पिण्याचे तसेच शेतीचे पाणी उपलब्ध होणार आहे. नर्मदा प्रकल्प म्हणजे सरदार सरोवर प्रकल्पामुळे आजपर्यंत अनेक आदिवासी गावे बुडाली होती. आणि हा प्रकल्प होऊ नये यासाठी उग्र आंदोलनेदेखील झालीत. विस्थापितांच्या पुनर्वसन प्रश्नी तीन राज्यांत वाद होता. त्यासाठीचा निधी महाराष्ट्राकडून मध्य प्रदेश आणि गुजरात मागत होते. परंतु पाणी वाटपाचा तिढा सुटल्याशिवाय महाराष्ट्राकडून निधी दिला जाणार नसल्याचे सांगितले जात होते. नर्मदा नदीच्या खोऱ्याचा भाग हा सातपुडा पर्वत रंगानी व्यापलेला आहे. म्हणून नर्मदा पाणी वाटपाचा सुटलेला प्रश्न महाराष्ट्र राज्यासाठी सुखदच ठरणार आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

■■

### बोगस पदवीचे देशाला ग्रहण

विद्येचे माहेरघर म्हणून संपूर्ण जगात पुणे शहराचे नाव प्रसिद्ध आहे परंतु याच पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये वित्त व लेखा विभागात काम करणाऱ्या रमेश दामोदर मुखेकर याने एका पालकाकडून ७० हजार रुपये घेऊन बी. कॉम. ची बोगस पदवी दिल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. आतापर्यंत पेपरफुटीचे तसेच विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्याचे अनेक प्रकार पुणे विद्यापीठातच नव्हे तर संपूर्ण देशातील अनेक विद्यापीठांमध्ये घडलेले आहेत. बोगस पदवीचे हे ग्रहण आपल्या देशाला मोठ्या प्रमाणावर घातक ठरत आहे. खरं तर विद्यार्थी आणि पालकांनी अशा प्रकारे चुकीच्या पद्धतीने पदवी प्राप्त करून घेणे हे त्यांच्या व देशाच्या हितासाठी घातक आहे याचा विचार सर्वांनी करणे गरजेचे आहे .

अशा प्रकारे बनावट पदवी प्राप्त केलेले विद्यार्थी चांगले डॉक्टर, चांगले इंजिनीयर होऊ शकत नाही व त्या विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त न झाल्यामुळे केवळ बनावट पदवी प्रमाणपत्राच्या साहाय्याने देशातील जनतेच्या बरोबर त्यांच्या जीवाशी खेळत आहेत. आजपर्यंत आपल्या देशामध्ये अशी बोगस पदवी प्रमाणपत्रे घेऊन अनेक बोगस डॉक्टरांनी या देशातील निष्पाप नागरिकांचे बळी घेतलेले आहेत. आजही आपल्या देशामध्ये असे अनेक बोगस डॉक्टर सर्रास व्यवसाय करत आहेत. अशा बोगस प्रमाणपत्र घेऊन नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या लोकांवर सरकारने कडक कारवाई करणे गरजेचे आहे.

**विजय आकुर्डेकर**/बिबवेवाडी. ८६६८९४८६१२

■■

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शिवश्री व्हिजन केअर सेंटरचा शुभारंभ उत्साहात

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ ऑगस्ट : शिवश्री फाउंडेशन, लातूर संचलित दृष्टी रक्षा प्रकल्प अंतर्गत शिवश्री व्हिजन केअर सेंटर या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ सोमवारी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. समाजातील प्रत्येक गरजू व्यक्तीला दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस बबन भोसले हे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा परिषदेचे आरोग्य सभापती जानेश्र्वर बिराजदार, काँग्रेस चे माजी जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, सुधीर पोतदार, अमर पाटील, बाळाजी गोटके, वेताळेश्र्वर बाबगे, विलास उफाडे यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात शिवश्री फाउंडेशनने समाजहितासाठी हाती घेतलेला हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद असून, भविष्यात हजारो गरजू नागरिकांच्या जीवनात प्रकाश निर्माण करणारा ठरेल, असा विश्र्वास व्यक्त केला. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत नेत्रसेवा पोहोचविण्याच्या कार्यासाठी फाउंडेशनला शुभेच्छा देत सर्वांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रारंभी फाउंडेशनचे अध्यक्ष उल्हास डोलारे यांनी प्रास्ताविक केले.



## विविध वृत्त.....

### ग्रामविकास सचिवांची जि. प. ला भेट



तभा वृत्तसेवा

लातूर : राज्याच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी शनिवारी (दि. १) लातूर जिल्हा परिषदेला भेट दिली.

यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सचिव पुलकुंडवार यांची भेट घेऊन हजारो जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या भवितव्याशी निगडीत असलेला समायोजन प्रक्रियेचा शासन निर्णय १८ मे २०११ रोजी काढला; पण जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्या २०१४ पासून सुरू झाल्याने २०११ च्या समायोजन आदेशाच्या परिपत्रकात अनेक त्रुटी व विसंगती असल्याने शिक्षकांमध्ये मोठी अस्वस्थता निर्माण झाल्याचे सांगितले.

यावेळी लातूर जिल्हा परिषदेचे सीईओ राहुल कुमार मीना, ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संजय इंगळे यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

### वृध्दाला चिरडले

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ ऑगस्ट : झाडाखाली गप्पा मारत बसलेल्यांपैकी एकाचा अंगावर तेथेच थांबलेल्या पिकअप चालकाने वाहन मागे घेताना एकाला चिरडले. यात जखमी व्यक्तीच्या अंगावर पिकअप गेल्याने बरगडीला मार लागल्याची घटना हालकी-वांजरखेडा रस्त्यावर नुकतीच घडली. याप्रकरणी शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्यात पिकअप चालकाविरोधात शनिवारी (दि.१) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनिल उर्फ अण्णाराव सानेराव सुरवसे (रा. हालकी ता. शिरूर अनंतपाळ) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांचे चुलत सासरे नमदेव सोपान बनसोडे (वय ७०) हालकी-वांजरखेडा रस्त्यावर

एकमेकांना गप्पा मारत रस्त्याच्या कडेच्या झाडाखाली बसले होते. त्याचवेळी तेथे थांबलेल्या पिकअप (एम एच २४ ए यू ८४५६) चालकाने वाहन सुरू करून मागे घेतले. त्याचवेळी नामदेव बनसोडे यांच्या अंगावर चाक गेले. यात त्यांची डावी बरगडी मोडली.

जखमी झालेल्या बनसोडे यांच्यावर उपचार घेतल्यानंतर पिकअप चालकाविरोधात शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्यात गुरनं. १६९/२६ कलम २८१, १२५ (अ), १२५ भारतीय न्यायसंहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास शिरूर अनंतपाळ पोलीस करीत आहेत.

### ७ तारखेला जि.प.ची सभा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ ऑगस्ट : येत्या सात तारखेला जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा आयोजित केली जाण्याची दाट शक्यता आहे. या अनुषंगाने, जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने जोरदार तयारी सुरू केली आहे. या सभेत १५व्या वित्त आयोगाच्या निधीचा विषय पुन्हा चर्चेत येण्याची शक्यता आहे.

गेल्या १६ मार्च २०२६ रोजी जिल्हा परिषद अध्यक्षांनी पदग्रहण केल्यानंतर मागच्या सात जुलै २०२६ रोजी पहिली विशेष सर्वसाधारण सभा पार पडली. ही सभा १५व्या वित्त आयोगाचा निधी वितरणासंबंधी होती, अशी चर्चा होती. सभेच्या शेवटी निधी वितरणावर चर्चा सुरू झाली. या आयोगाच्या निधी वितरणावरून बरेच रणकंदन झाले असले तरी समसमान निधी वितरणावर विरोधकांचा भर होता. आता येत्या सात ऑगस्ट रोजी आयोजिल्या जाणाऱ्या सभेत देखील निधी वितरणावर जोरदार चर्चा होईल. निधी वितरणात दुजाभाव होऊ नये अशी सदस्यांची इच्छा आहे. निधी वितरणाचे नेमके सूत्र काय ठेवले जाणार ? हे सभा पार पडल्यानंतर कळेल. सध्या सभेची चर्चा सुरू असली तरी सोमवारी अधिकृत सभेचा अजेंडा जाहीर होण्याची शक्यता असून, सभेचे विषय यावर सध्या तयारी सुरू असल्याचे सांगण्यात आले. निधी वितरणाशिवाय इतर विषयही सभेत असणार. अजून तरी विषयांचा इतिवृत्त बाहेर आलेला नाही.

## वीरशैव लिंगायत समाज, लातूरच्यावतीने मनपा प्रशासनाला विविध मागण्यांचे निवेदन



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३ ऑगस्ट : वीरशैव लिंगायत समाज, लातूर यांच्या वतीने लातूर महानगरपालिकेचे आयुक्त, महापौर व विरोधी पक्षनेते यांना समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत निवेदन देण्यात आले. यामध्ये विशेषत्वाने कन्हेरी चौक येथील कैलासधाम स्मशानभूमीचा प्रश्न आणि माजी केंद्रीय गृहमंत्री कै. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्मारकाच्या उभारणीची मागणी प्राधान्याने करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, कन्हेरी चौक येथील वीरशैव लिंगायत समाजासाठी राखीव असलेल्या कैलासधाम स्मशानभूमीला जवळपास ३० वर्षांचा कालावधी लोटला असूनही तेथे अद्याप अंत्यसंस्काराची प्रक्रिया सुरू होऊ शकलेली नाही. या जागेची देखभाल करण्याचा ताबा समाजाकडे असला तरी विविध प्रशासकीय अडचणींमुळे तेथे अंत्यविधी करण्यास स्थगिती देण्यात आली आहे. आजघडीला लातूर शहरात वीरशैव लिंगायत समाज बांधवांची संख्या लक्षणीय वाढली आहे. वाढत्या संख्येच्या तुलनेत स्मशानभूमीचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत चालला आहे. याकडे मनपा प्रशासनाने गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. समाजातील नागरिकांना अंत्यसंस्कारासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, हा प्रश्न तातडीने सोडवून स्मशानभूमी समाजासाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

तसेच लातूरचे वैभव आणि देशाचे माजी गृहमंत्री कै. शिवराज पाटील चाकूरकर यांचे स्मारक लातूर महानगरपालिकेच्या प्रांगणातच उभारण्यात यावे, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली. शिवराज पाटील यांनी नगरपरिषदेचे सदस्य व अध्यक्ष, लातूरचे आमदार, महाराष्ट्र शासनातील मंत्री, लोकसभेचे खासदार, लोकसभेचे सभापती, देशाचे गृहमंत्री तसेच पंजाब राज्याचे राज्यपाल अशा विविध महत्त्वाच्या पदांवर कार्य करून लातूरचे नाव देशपातळीवर पोहोचवले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

त्यांचे कार्य पुढील पिढ्यांना प्रेरणादायी ठरावे यासाठी स्मारक महापालिकेच्या प्रांगणातच उभारण्यात यावे. महाराष्ट्र शासन स्मारकासाठी निधी देण्यास तयार असून पुतळा अन्यत्र हलविण्याचा प्रयत्न झाल्यास समाजामध्ये तीव्र नाराजी निर्माण होऊ शकते, असेही निवेदनात म्हटले आहे. महापालिका प्रशासनाने समाजाच्या भावना लक्षात घेऊन कैलासधाम स्मशानभूमीचा प्रश्न आणि शिवराज पाटील चाकूरकर स्मारकाचा प्रस्ताव तातडीने मंजूर करून समाजाला न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी उमाकांत कोरे, सुनील भीमपूरे, बालाजी पिंपळे, सुहास आष्टगे, अमित पाटील, बंडप्पा जवळे, मन्मथ चिकले, भालचंद्र दानाई, लहू खरोळे, सतीश जोंधळे, शंकर सुगरे, सूर्यकांत हत्ते यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

## लोकशाही दिनाला जिल्हाधिकारी, मनपा आयुक्तांची प्रत्यक्ष उपस्थिती अनिवार्य करा;- सुनिल मंदाडे

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ ऑगस्ट : सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी व समस्या जलदगतीने व न्याय्य पद्धतीने सोडविण्यासाठी शासनाने सुरू केलेला लोकशाही दिन हा महत्त्वाचा उपक्रम अधिक प्रभावी करण्यासाठी जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी स्वतः उपस्थित राहावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुनिल मंदाडे यांनी केली आहे.

नागरिक विविध शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार पाठपुरावा करूनही कामे मार्गी लागत नसल्याने अखेर लोकशाही दिनामध्ये अर्ज सादर करतात. मात्र, अनेकदा जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त स्वतः उपस्थित राहत नसून त्यांच्या प्रतिनिधींमार्फत सुनावणी घेतली जाते. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारींवर अपेक्षित निर्णय होत नसल्याची भावना व्यक्त होत आहे.

तसेच, संबंधित विभागप्रमुखही अनेकदा अनुपस्थित राहत असल्याने तक्रारींचे तातडीने निराकरण होत नाही. परिणामी, लोकशाही दिनाच्या मूळ उद्देशालाच बाधा पोहोचत असून हा उपक्रम केवळ औपचारिकता ठरत असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे.

याशिवाय, लोकशाही दिनात अर्ज स्वीकारल्यानंतर अनेकदा अर्जदारांना टोकन क्रमांक किंवा पोहोच पावती दिली जात नसल्याने अर्जाच्या पुढील कार्यवाहीबाबत संभ्रम निर्माण होतो. त्यामुळे प्रत्येक अर्जाला टोकन क्रमांक व पोहोच पावती देणे बंधनकारक करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

सामाजिक कार्यकर्ते सुनिल मंदाडे यांनी जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी लोकशाही दिनाच्या दिवशी स्वतः उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारी ऐकाव्यात, संबंधित विभागप्रमुखांची उपस्थिती अनिवार्य करावी तसेच अर्ज स्वीकारताना टोकन व पोहोच पावती देण्याची सक्ती करावी, अशी मागणी केली आहे.

लोकशाही दिन हा प्रशासन आणि नागरिक यांच्यातील विश्र्वास अधिक दृढ करणारा लोकाभिमुख उपक्रम असून, त्याचे गांभीर्य आणि प्रभाव कायम राखण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

## डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन इंडिया पुणेचा बेस्ट शुगर फॅक्टरी पुरस्कार मांजरा साखर कारखान्यास जाहीर



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ ऑगस्ट : राज्यात सहकार क्षेत्रातील साखर कारखानदारीत अव्वल स्थानी असलेल्या लातूरच्या विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखान्यास द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन इंडिया पुणे यांच्या वतीने देण्यात येणारा बेस्ट शुगर फॅक्टरी-२०२६ विशेष पुरस्क ार जाहीर झाला आहे. कारखान्याने गेल्या ३ वर्षात १०० टक्के उसाची तोड केवळ हार्वेस्टरद्वारे होत असून याचे जनक व कारखान्याचे चेअरमन राज्याचे माजी मंत्री, स हकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्याकडे जाते देशभरात केवळ मांजरा साखर कारखाना १०० टक्के हार्वेस्टरद्वारे ऊस तोडणारा पहिला कारखाना ठरलेला आहे. हा पुरस्कार मिळाल्याने राज्यभरातून मांजरा साखर कारखान्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे

द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन इंडिया पुणे यांच्या वतीने ७१ व्या वार्षिक परिषद व साखर एक्सपो २०२६ इंडिया या कार्यक्रमांमध्ये दि. ८ ऑगस्ट रोजी हॉटेल जे. डब्ल्यू. मेरीयट पुणे येथे मान्यवराच्या हस्ते या पुरस्काराचे शानदार सोहळ्यात वितरण करण्यात येणार आहे.

साखर उद्योगाकडे मजुरांची कमतरता व उसाचे क्षेत्र अधिक झाल्याने मे महिन्यापर्यंत चालू ठेवावे लागत असे. कधी ऊस तोड कामगार मध्येच निघून जायचे त्यामुळे कारखान्यास उसाचे गाळप उशिरा होऊ लागले. त्यानंतर माजी मंत्री सहकार, महर्षी दिलीपराव देशमुख यांनी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मदतीने ऊस तोडणीसाठी कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद व होतकरू तरुणांना ऊस तोडणीसाठी हार्वेस्टर देण्यात आले. त्यात तोडणी यशस्वी झाली ऊस उत्पादक शेतकऱ्यांची ऊस तोड लवकर होऊ लागली. त्यानंतर जिल्हा बँकेकडून बँकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख यांनी शेतकऱ्यांना हार्वेस्टर कर्ज योजना सुरू केली.

त्यात ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांनी स्वतः बँकेकडून कर्ज काढून हार्वेस्टर खरेदी केले. त्यातुन बहुतांश हार्वेस्टर साखर कारखान्याला भाड्याने लावली. विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखान्याची स्वतः ची २५ हार्वेस्टर व कारखान्याने हमीवर दिलेले ५५ हार्वेस्टर, असे एकूण ८० हार्वेस्टरद्वारे १०० टक्के ऊस तोडणी आत्ताच झालेल्या गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये झालेली आ-हे. त्यामुळे विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर हा देशात १०० टक्के ऊस तोडणी हार्वे स्टरद्वारे होणारा केवळ राज्यातील नाही तर देशातील पहिला साखर कारखाना ठरला आहे.

### वाले इंग्लिश स्कूलमध्ये रक्त तपासणी शिबिर संपन्न

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ ऑगस्ट लातूर ज्योतिबा क्लिनिक लॅबोरेटरी आणि भोलेनाथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, लातूरच्या वतीने रक्त तपासणी शिबिर संपन्न झाली. या शिबिरात शाळेतील विद्यार्थी, शिक्षक यांनी उत्फूर्तपणे सहभाग नोंदवला या तपासणीमध्ये विविध प्रकारच्या रक्त चाचण्या करण्यात आल्या.

## लातुरात डेंग्यूविरोधात ॲबेटिंग मोहीम



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ ऑगस्ट : सध्या सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे अनेक भागात पाणी साचून राहत आहे. त्याचप्रमाणे ओल असल्याने घरांतील साधनांमध्येही डेंग्यूच्या डासांच्या अळ्यांची पैदास वाढली आहे. त्यावर प्रतिबंध आणण्यासाठी महापालिकेच्यावतीने घरोघरी जाऊन ॲबेटिंग मोहीम राबविण्यात येत आहे. ही मोहीम दि. ८ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. यावेळी घरोघरी जाऊन आरोग्यसेविका व स्वच्छता कर्मचारी तापाच्या रुग्णांचीही चौकशी करून रक्त नमुने घेत आहेत. महापालिकेच्यावतीने राबविण्यात येणारी ही दुसरी ॲबेटिंग मोहीम आहे.


शहरात डेंग्यू आजाराच्या रुग्णांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. सध्या सतत पाऊस व सूर्यदर्शनाच्या अभावामुळे डेंग्यू डास तयार करणाऱ्या एडिस एजिप्ती अळ्यांची पैदासही जलसाठ्यांमध्ये होत आहे. यासाठी महापालिकेच्यावतीने दुसरी ॲबेटिंग मोहीम सुरू करण्यात आली आहे. शहरातील ८३ हजार २५७ घरांमध्ये महापालिकेचे कर्मचारी जाऊन पाणीसाठे तपासत आहेत. त्यात अळ्या आढळून आल्या तर ॲबेटिंग करीत आहेत. त्याचप्रमाणे तापाचे रुग्ण आढळून आले तर त्यांना प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रांमध्ये जाऊन रक्त तपासण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

डेंग्यू डासांची उत्पत्ती टाळण्यसाठी प्रत्येक घरात एक दिवस कोरडा पाळण्याची गरज आहे. घरातील सर्व भांडी कोरडी करून घ्यावीत, त्याचप्रमाणे पाणी साठे झाकून ठेवावेत, डासांपासून संरक्षणासाठी घराच्या खिडक्यांना जाळ्या बसवाव्यात, झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा, तापात ॲस्पिरीन किंवा ब्रुफेन अशी औषधे घेणे टाळावे, ती धोकादायक ठरू शकतात, ताप

येताच महापालिकेच्या प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रात जाऊन वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला घ्यावा, कोणताही ताप अंगावर काढू नये, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

या वर्षात आतापर्यंत २१८ संशयितांची डेंग्यू तपासणी करण्यात आली आहे. त्यातील ८ जणांना डेंग्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याच प्रमाणे एका रुग्णाला चिकुन गुनियाही झाल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे नागरिकांनी डेंग्यू प्रतिबंध करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संघटनेच्या ताकदीवरच शेतकऱ्यांच्या समस्या सोडवता येतील : सुभाष महाजन




तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३ ऑगस्ट : देशभर कर्मचार्यांच्या वेतनासाठी आंदोलन होत नाहीत. त्यांना वेतनवाढीसाठी पाठपुरावा करावा लागत नाही. कारण त्यांना प्रत्येक आयोगानुसार वेतनश्रेणी दिली जाते. पाचवा आयोग, सहावा आयोग, सातवा आयोगानुसार त्यांना योग्य मोबदला मिळतो. तसेच इतर संघटनाही आपआपल्या ताकदीवर आपल्या मागण्या मंजूर घेण्यात यशस्वी होतात. परंतु गावोगावी शेतकरी असताना त्यांच्या प्रश्नावर उत्तर मिळू शकले नाही किंवा त्यांना योग्य न्याय मिळाला नाही, हीच खरी शेतकर्यांची शोकांतिका असून संघटनेच्या ताकदीवरच शेतकर्यांच्या समस्या सोडविण्यात आपल्याला यश येईल, असे मत भारतीय किसान संघाचे महाराष्ट्र प्रांत मंत्री सुभाष महाजन यांनी सूत मील रोडवरील माधव स्मृती या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कार्यालयात आयोजीत भारतीय किसान संघाच्या नियोजन मंडळ बैठकीत व्यक्त केले.

यावेळी पद्मश्री पुरस्कार प्राप्त डॉ. दादा लाड, भारतीय किसान संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले, जिल्हा मंत्री सतीश देशपांडे तावशीकर, भारतीय किसान संघाच्या लातूर जिल्हा महिला प्रमुख शामाताई हुरदळे आदिंची उपस्थिती होती. यावेळी लातूर जिल्हा भारतीय किसान संघाचे जिल्हा मंत्री सतीश देशपांडे तावशीकर यांनी मागील वर्षी भारतीय किसान संघाच्या वतीने करण्यात आलेल्या कामाची माहिती उपस्थितांसमोर ठेवली. तसेच आगामी काळात लातूर जिल्ह्यातील भारतीय किसान संघाच्या कामाविषयीची माहिती या आढावा बैठकीत सादर केली. जिल्ह्यात २२०० सदस्य असून आगामी काळात ३१ हजार सदस्य करण्याचे उद्दिष्ट त्यांनी यावेळी बोलून दाखविले. जिल्ह्यातील सोयाबीनच्या कार्यशाळा व शेतकरी मेळावे या माध्यमातून भारतीय किसान संघाचे काम गावागावात पोहचविण्याचे काम यापूर्वी केल्याचे सांगून जिल्ह्यात विक्रमी शेतकरी मेळावे झाले व त्या मेळाव्यात शेतकर्यांना तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक उत्पन्न कसे घेता येईल यावर मार्गदर्शन करण्यात आले. आज झालेल्या बैठकीत जिल्ह्यातील १० तालुक्यातील तालुकाध्यक्षांनी आपआपल्या कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या भारतीय किसान संघाच्या कामाविषयीची माहिती देऊन यापुढील काळात भारतीय किसान संघाचे काम कसे पुढे नेता येईल यासाठी सर्वो तोपरी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. तसेच या कार्यक्रमात महिला युवा प्रतिनिधी म्हणून वैशाली जितेश चापसी या युवतीने अतिशय आक्रमक व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करून शेती व्यवसायात पुढील तरूण पिढी यायची असेल तर त्यांना तंत्रज्ञानाची जोड द्यावी लागेल. यापूर्वी आपण पारंपारीक शेती न करत तंत्रज्ञानावर आधारीत आधुनिक शेती केली तर येणारी पिढी या क्षेत्रात अधिक जोमाने काम करेल असे सांगून शेती उद्योगाकडे नकारात्मक दृष्टीकोणातून पाहिले जाते. त्यासाठी सकारात्मक दृष्टीकोण समोर ठेऊन कुटुंबाने पाठबळ देण्याची गरज असल्याचे सांगितले.

प्रारंभी भारतीय किसान संघाच्या पद्यगीताने व प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. लातूर जिल्हा कार्यालय मंत्री विलास आराध्ये यांनी लातूर जिल्ह्यातील भारतीय किसान संघाच्या कार्याला उजाळा दिला. आगामी काळात भारतीय किसान संघच्या वतीने राबविण्यात येणार्या अनेक उपक्रमांची माहिती उपस्थित पाहुण्यांना दिली. तसेच या बैठकीत जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले यांनी काही ठराव मांडले. त्या ठरावालाही सर्वांनी मान्यता देऊन येणार्या विभागीय बैठकीत या ठरावाची माहिती वरिष्ठांना देण्याचे ठरले. यावेळी युवा प्रांत प्रतिनिधी नवनाथ मद्दे मामा यांनी भारतीय किसान संघाच्या आजपर्यंतच्या वाटचालीची माहिती दिली. यावेळी मोठ्या प्रमाणावर पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विलास आराध्ये यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### श्रीनिवास आकनगिरे यांचे निधन



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. ३ ऑगस्ट : येथील पंचायत समितीचे माजी उपसभापती तथा सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास अंगदराव आकनगिरे (वय ६१) यांचे रविवारी (दि. २ ऑगस्ट) अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर रविवारी दुपारी रेणापूर येथील येलम गल्ली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक बहीण व एक भाऊ असा परिवार आहे. दरम्यान, श्रीनिवास अकनगिरे यांच्या निधनाबद्दल मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

### अहिल्यादेवी माध्यमिक विद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ३ ऑगस्ट : स्थानिक शाळेमध्ये १ ऑगस्ट रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी संयुक्तपणे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या संयुक्त स्मृती प्रित्यर्थ आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सचिन साबणे हे होते, तर प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. निलम थोरात उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दोन्ही थोर विभूतींच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने झाली. या प्रसंगी शाळेतील शिक्षक पळणाटे व खिंडे यांनी आपल्या मनोगतातून लोकमान्य टिळकांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान आणि अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील व समाजसुधारणेतील क्रांती यावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक सचिन साबणे यांनी विद्यार्थ्यांना या दोन्ही महापुरुषांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नेटके व उत्कृष्ट सूत्रसंचालन . येवरे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार प्रदर्शन खिंडे यांनी मानले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रेणापूर नगराध्यक्षपदी खैरुनिसा मारुफ अत्तार



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. ३ ऑगस्ट : नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा शोभाताई शामराव अकनगिरे या रजेवर गेल्याने कामांचा तातडीने निपटारा व्हावा, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मुख्याधिकारी अजितकुमार डोके, प्रशासकीय अधिकारी प्रदीप पाटील व ज्ञानदेव दहिफळे यांनी दिली. त्यांच्या पदाचा कार्यभार उपनगराध्यक्षा खैरुनिसा मारूफ अत्तार यांच्याकडे अधिकृतपणे सोपविण्यात आला.

नगरपंचायत प्रशासनाच्या नियमानुसार दैनंदिन कामकाज सुरळीत राहावे, विकासकामांना गती मिळावी आणि नागरिकांच्या पदभार स्वीकारल्यानंतर अत्तार यांनी विविध विभागांचा आढावा घेतला. रेणापूरच्या मुस्लिम समाजातील पहिल्या नगराध्यक्षाचा मान त्यांना मिळाला आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी प्रामाणिक कार्यकर्त्यांचे योगदान महत्त्वाचे : ॲड. धनजय कोरे



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. ३ ऑगस्ट : चाकूर तालुका कॉंग्रेस व शहर कॉंग्रेस पक्षाच्या वतीने चाकूर येथील एमआयडिसी मधील कॉंग्रेस पक्षाच्या कार्यालयात संवाद व आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.बैठकीच्या अध्यक्ष स्थानी कॉंग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष न्ड.धनंजय कोरे होते. व्यासपीठावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी तालुका अध्यक्ष विलासराव पाटील चाकूरकर होते.प्रमुख उपस्थिती सेवादल जिल्हाध्यक्ष अनिल चव्हाण,युवक कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष निलेश देशमुख,शहर अध्यक्ष पप्पुभाई शेख आदी उपस्थित होते.

कै.शिवराज पाटील चाकूरकर व कै.विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.चाकूर तालुक्यात मागील काळात पक्ष संघटन व पक्ष बांधणी न झाल्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीत दारुण पराभव पत्कारावा लागला होता.पाच जिल्हा परिषद व दहा पंचायत समितीच्या निवडणूकीत पक्षाला खातेही उघडता आले नाही.यावर या संवाद बैठकीत चर्चा करण्यात आली.प्रस्ताविक पप्पुभाई शेख यांनी केले. निलेश देशमुख,अनिल चव्हाण,विलासराव पाटील चाकूरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी विलासराव पाटील म्हणाले पक्षाची संघटनात्मक बांधणी करावी लागेल.देशात व राज्यात सध्या सत्ताधारी पक्षाच्या विरोधात जनमत तयार होत आहे.महागाई,बेरोजगारी,नीट पेपर लिंक,जंतर-मंतर वर विद्यार्थी आंदोलन, शेतकऱ्यांचे प्रश्न,पिक विमा, बोगस सोयाबीन,यासारख्या अनेक प्रश्नांवर सरकारची पीछेहाट होताना दिसत आहे.कॉंग्रेस पक्षाचे विरोधी पक्ष नेते खा.राहुल गांधी यांचे लोकशाही मार्गाने विद्यार्थ्यांच्या मागणीसाठी केलेले जन आंदोलन दडपशाही करून मोडीत काढल्यामुळे केंद्र सरकारांवर चौफेर टीका होत आहे.अशावेळी चाकूर तालुक्यात कॉंग्रेस पक्षाचे संघटन वाढविणे महत्त्वाचे आहे. अनिल चव्हाण म्हणाले अहमदपुर-चाकूर विधानसभा मतदारसंघात आपला प्रमुख विरोधक पक्ष म्हणून भाजपा नसून राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट असल्याचे त्यांनी सांगितले.युवक कॉंग्रेसच्या माध्यमातून तालुक्यातील १५५ बुथ वर प्रत्येक १० ते १५ युवक कार्यकर्ते नेमणूक करून पक्ष बळकट करण्यात येणार असल्याचे युवक जिल्हा अध्यक्ष निलेश देशमुख यांनी सांगितले

तालुका अध्यक्ष न्ड.धनजय कोरे बोलताना म्हणाले तालुक्यात दर एका महिन्याला संघटन वाढीसाठी बैठक घेण्यात येईल व तालुक्यात कॉंग्रेस पक्ष जोमाने काम करून पक्षाला गतवैभव मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी तयार राहावे असे आहवान केले.

यावेळी बैठकीस सुभाष शंकरे,बाबुराव तरगुडे,व्यंकट माने,शिराज देशमुख,सचिन चाकुरकर,दिलीप येनगे,लहु कोरे,सजंय पाटील,व्यंकट माचवे, गफुर मासुलदार,विजय धनेश्र्वर,मायाताई सोरटे,नरसिंग भुरे,राजकुमार बेडके,कृष्णा नाईकवाडे,अमजद घोरवाडे,सलीमभाई तांबोळी,अझहर सौदागर,नयुम शेख,नागनाथ गंगापुरे,गिरजाप्पा ईडुरे,विवेकानंद गुडदे,विनायक जोडतले,व्यंकट माचवे,विश्र्वनाथ कलवले,सुर्यकांत मनदुमले,रोहित कांबळे,केशव सोरटे,संजीवकुमार भोसले,सुनील शिंदे,तुकाराम सावंत सह तालुक्यातील व शहरातील कॉंग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

# आज उदगीर येथे जडीबुटी दिवस, योग शिबिर व भव्य जडीबुटी प्रदर्शन



तभा वृत्तसेवा

उदगीर, दि. ३ ऑगस्ट : कलियुगातील धन्वंतरी म्हणून ओळखले जाणारे आचार्य श्री बालकृष्णजी महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त पतंजली योग समिती, उदगीर यांच्या वतीने आज मंगळवार, दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजी जडीबुटी दिवस विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. आयुर्वेद, योग आणि औषधी वनस्पतींचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने योग शिबिर, जडीबुटी प्रदर्शन आणि जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या निमित्ताने राजर्षी शाहू विद्यालय, शेल्हाळ रोड, उदगीर येथे सकाळी ७.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत भव्य जडीबुटी व औषधी वनस्पती माहिती प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. प्रदर्शनीमध्ये आचार्य बालकृष्णजी महाराज यांच्या आयुर्वेद संशोधनावर आधारित माहितीपत्रके, औषधी वनस्पतींचे औषधी गुणधर्म, त्यांचे विविध उपयोग तसेच आयुर्वेदविषयक भित्तीपत्रकांचे प्रदर्शन करण्यात येणार आहे. आयुर्वेद, योग आणि नैसर्गिक जीवनशैलीबाबत जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ५.३० ते ७.०० या वेळेत आयोजित योग शिबिराने होणार असून, योग शिबिराचे उद्घाटन मा. अनिलजी अमृतवार सर (राज्य प्रभारी, पतंजली योग समिती, महाराष्ट्र पूर्व) यांच्या हस्ते होईल. योग शिबिरासाठी मा. अनिलजी अमृतवार हे मुख्य मार्गदर्शक व त्यांच्या सोबत मा. धनराज बिरादार (माजी राज्य प्रभारी, शिक्षक संघटन, पतंजली योग समिती, महाराष्ट्र पूर्व)

हे योग मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून योगाभ्यास, आयुर्वेद आणि निरोगी जीवनशैलीविषयी मार्गदर्शन करणार आहेत. या योग वर्गाचे योग शिक्षक म्हणून चंद्रकांतजी जाधव सर (अध्यक्ष, किसान सेवा समिती,उदगीर) हे राहणार आहेत.

संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन पतंजली योग समिती, महाराष्ट्र राज्य (पूर्व) चे राज्य प्रभारी मा. अनिलजी अमृतवार सर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे.

# बोथी गावाच्या गावठाण विस्तारसाठी बाबासाहेब पाटील यांना ग्रामस्थांचे निवेदन



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. ३ ऑगस्ट : चाकूर तालुक्यातील बोथी येथे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या वस्तिवाढ (गावठाण विस्तार) प्रकरणातील कबाला पावत्या मिळाव्यात या प्रमुख मागणीसाठी ग्रामस्थांनी नामदार सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.यावेळी बोथी गावातील महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक, लाभार्थी, विविध पदाधिकारी उपस्थित होते.गावातील महिलांनी आपल्या अडचणी, अनेक वर्षांपासून सुरू असलेली प्रतीक्षा आणि वस्तिवाढ प्रक्रियेमुळे होत असलेल्या अडचणी मंत्र्यांसमोर अत्यंत भावनिक शब्दांत मांडल्या. ग्रामस्थांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेत नामदार बाबासाहेब पाटील यांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेतली.

प्रलंबित प्रश्न लवकर निकाली काढण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील त्यांनी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून, आवश्यक कार्यवाही तातडीने करण्याचे आणि या विषयावर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्याच्या सूचना दिल्या.

मंत्र्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे उपस्थित ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसून आले. अनेक वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या बोथीकरांना आता आपल्या हक्काच्या कबाला पावत्या मिळण्याची आशा अधिक बळकट झाली आहे. हा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, असा विश्र्वास उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केला. या प्रसंगी ग्रामस्थांनी नामदार बाबासाहेब पाटील यांचे आभार मानत, गावाच्या विकासासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी दाखविलेल्या संवेदनशील भूमिकेचे स्वागत केले.

### उदयगिरीत क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी




तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ३ ऑगस्ट : येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात स्वातंत्र्य लढ्यातील थोर सेनानी क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे कोषाध्यक्ष महादेव नौबदे यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे, ग्रंथपाल डॉ. एल. बी. पेन्सलवार, दिनविशेष समिती प्रमुख प्रा. डॉ. एम. जे. कुलकर्णी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### रेल्वे रुळांवरून दुचाकीसह मार्ग ओलांडू नका – तो जीवघेणा ठरू शकतो !

#### रेल्वे सुरक्षा दल यांचे नागरिकांना आवाहन



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ३ ऑगस्ट : रेल्वे सुरक्षा दल (ठझऋ), परळी वैजनाथ यांच्या वतीने उदगीर ते परळी मार्गावरील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही परिस्थितीत मोटारसायकल, स्कूटर किंवा इतर कोणतेही वाहन घेऊन रेल्वे रुळ अनधिकृतपणे ओलांडू नयेत.

वेळ वाचविण्याच्या उद्देशाने अनेक नागरिक रेल्वे रुळांवरून दुचाकी घेऊन शॉर्टकटचा वापर करतात. मात्र, ही कृती अत्यंत धोकादायक असून जीवितास गंभीर धोका निर्माण करणारी आहे. वेगाने धावणाऱ्या रेल्वेगाडीचा वेग आणि अंतराचा अचूक अंदाज येत नसल्यामुळे क्षणात गंभीर अपघात होऊन जीवितहानी होऊ शकते.

रेल्वे रुळ अनधिकृतपणे ओलांडणे हा रेल्वे कायद्यानुसार दंडनीय गुन्हा आहे. अशा प्रकारे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

नागरिकांनी रेल्वे रुळ ओलांडण्यासाठी केवळ अधिकृत रेल्वे फाटक, रोड ओव्हर ब्रिज, रोड अंडर ब्रिज किंवा पादचाऱ्यांसाठी उपलब्ध अधिकृत मार्गांचाच वापर करावा.

काही क्षणांचा वेळ वाचविण्याचा प्रयत्न आयुष्यभराची हानी ठरू शकतो. आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे सुरक्षा नियमांचे पालन करा आणि इतरांनाही त्याबाबत जागरूक करा.

# संजीवनी महाविद्यालयात लेखन प्रेरणादिन साजरा



तभा वृत्तसेवा

चापोली दि. ३ ऑगस्ट : तालुक्यातील चापोली येथील संजीवनी महावद्यिालयात लोकशाह-ीर अण्णाभाऊ साठे यांचा जन्मदिन 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतीमेचेही पूजन यावेळी करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. चाटे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या

संघर्षमय जीवनकार्याचा आणि साहित्यीक योगदानाचा आढावा घेत विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांचा आदर्श घेण्याचे आवाहन केले. तसेच लेखन हे व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम असून समाजपरिवर्तनासाठी लेखणीचे सामर्थ्य मोठे असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले. विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड जोपासून नियमित लेखनाची सवय लावावी, असे आवाहनही त्यांनी केले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयातील ग्रंथालय, मराठी विभाग आणि हिंदी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य, सामाजिक कार्य, समतेचा संदेश आणि त्यांच्या जीवनसंघर्षावर आधारित प्रभावी निबंध सादर केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये लेखनकौशल्य विकसित होण्यास तसेच साहित्याविषयीची अभिरुची वाढण्यास मदत झाली.

या कार्यक्रमास संस्थेचे सचिव तथा सरपंच डॉ. भालचंद्र चाटे, प्रा. डॉ. संतराम मुंढे, उपप्राचार्य रमेश गुट्टे, प्रा. डॉ. मंदाकिनी थोरात, कार्यक्रमाधिकारी प्रा. धनंजय तिगोटे, प्रा. सचिन बोबे, प्रा. डॉ. रंजित चव्हाण, प्रा. डॉ. विजयकुमार ढोले, प्रा. डॉ. धीरज व्हत्ते यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्यामार्य कन्या विद्यालयात टिळक पुण्यतिथी, साठे जयंती उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ३ ऑगस्ट : श्यामार्य कन्या विद्यालयात भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे महान प्रेरणास्थान लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत दोन्ही महापुरुषांच्या कार्याचा जागर केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. संगीता देशमुख या होत्या, तर पर्यवेक्षक राहुल लिमये यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थिनींनी लोकमान्य टिळक आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर आधारित मनोगते, भाषणे व विचार सादर केले.

या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या भाषण स्पर्धे ला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# एकाच सरीवर अनेक पिकांचा प्रयोग; बेवनाळच्या प्रगतीशील शेतकऱ्याचा आदर्श



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ३ ऑगस्ट : तालुक्यातील बेवनाळ येथील प्रगतिशील शेतकरी जनार्दन पाटील यांनी बागायती शेतीत कमी खर्चात अधिक उत्पादन मिळविण्याचा अभिनव प्रयोग यशस्वी करून दाखविला आहे. एकदाच मशागत करून तयार केलेल्या सरीचा वर्षभर विविध पिकांसाठी वापर करण्याची त्यांची पद्धत परिसरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

जनार्दन पाटील यांच्या शेतात एका सरीवर सलग अनेक पिके घेतली जातात. यंदा टरबूज पिकाची काढणी झाल्यानंतर त्याच सरीवर दोडका आणि झेंडूची लागवड करण्यात आली आहे. याशिवाय त्यांच्या शेतात वेळोवेळी टोमॅटो, कांदा, कोबी, फुलकोबी यांसह विविध भाजीपाला पिकांचे उत्पादन घेतले जाते. नाविन्यपूर्ण शेती पद्धतीमुळे त्यांना कृषी विभागाकडून अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

शिरूर अनंतपाळ तालुक्यात झेंडूचे पीक इतर शेतकऱ्याकडून सहसा घेतले जात नाही. मात्र जनार्दन पाटील यांच्याकडून मात्र कोणतीही जमीन रिकामी न ठेवता प्रत्येक हंगामात वेगवेगळ्या पिकांचे नियोजन करतात. त्यामुळे त्यांच्या शेतातील बहरलेला झेंडू पाहण्यासाठी परिसरातील शेतकरी तसेच नातेवाईक आवर्जून भेट देत असून, हा प्रयोग सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहे.

एकदाच मशागत करून त्याच सरीवर सलग अनेक पिके घेण्याच्या पद्धतीला कृषी क्षेत्रात एसआरटी तंत्रज्ञान म्हणून ओळखले जाते. मात्र जनार्दन पाटील या पद्धतीला स्थानिक भाषेत 'उस्ता बेड' असे संबोधतात. प्रत्येक पिकासाठी नव्याने मशागत करण्याची गरज नसते. व्यवस्थापन आणि पाण्याचे योग्य नियोजन केल्यास एकाच सरीवर सलग अनेक पिके घेता येतात. त्यामुळे मशागतीचा खर्च वाचतो, वेळेची बचत होते आणि शेती अधिक किफायतशीर बनते, असे त्यांनी यावेळी सांगितले.

शेतीतील नाविन्यपूर्ण प्रयोग, खर्चात बचत आणि अधिक उत्पादन या त्रिसूत्रीचा अवलंब करून जनार्दन पाटील यांनी प्रगतिशील शेतीचा आदर्श निर्माण केला असून, त्यांच्या या प्रयोगाची तालुक्यात सर्वत्र चर्चा होत आहे.

सोलापूर तरुण भारत — न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## कर्तृत्वाचे आकाश

निकिता गावंडे/९९७०६६३८१३

# भंगारातून जग घडविणारे शिल्पकार



मंडळी! आजचा लेख हा जोडी स्पेशल, दोघा भावांची कहाणी! परिस्थितीच्या टक्केटोणप्यांनी छन्नी-हातोड्याविनाच त्यांना घडवले. वडिलांच्या अकाली निधनानंतर इंजीनियरिंग वर्कशॉपची जबाबदारी त्यांच्या कोवळ्या खांद्यांवर आली. ना गाठीशी अनुभव ना व्यवहारातले छक्के पंजे माहीत. मग काय! आज काय खायचं व घरी काय न्यायचं या विवंचनेतून डोळ्यांना भंगारात विविध आकार दिसू लागले. मध्यवर्ती नागपुरातील म्हाडा सिटीच्या प्रशस्त इमारतीत सुंदर, हवेशीर फ्लॅटमध्ये एक हसतं-खेळतं एकत्रित कुटुंब राहतं. प्रशांत वडाळकर आणि त्यांचे लहान भाऊ तुषार वडाळकर दोघेही भंगारातून विविध आकार शोधणारे कसलेले कलाकार आहेत.

'लहान मुलांना जसे रंगांच्या ठिपक्यात वेगवेगळे आकार दिसतात तसे आम्हाला आमच्या वर्कशॉपच्या स्क्रॅपमध्ये दिसायचे. धंद्याचे गणित काही जमत नव्हते. भरपूर रिकामा वेळ आणि फ्रस्ट्रेट झालेला मेंदू घेऊन आम्ही वर्कशॉपमध्ये निव्वळ टाईमपास करायचो,' प्रशांत सांगतात. असेच एकदा रिकाम्या पोटाने व विचारांनी तुडुंब भरलेल्या डोक्याने त्यांनी वर्कशॉपमधील स्क्रॅप विकायला काढले. त्यात काही वेगळे आकार त्यांना दिसू लागले. मग विकणे तर सोडाच ते आकार न्याहाळण्याचा छंदच त्यांना लागला. एका मागून एक वेगवेगळ्या कलाकृती तयार होऊ लागल्या. या दोन्ही भावांच्या कलेचे हे विशेष आहे की, ते कुठलाही कृत्रिम रंग वापरत नाहीत किंवा मिळालेल्या वस्तूच्या आकारात काहीही बदल करत नाहीत.' निसर्गानेच लोखंडाला इतका सुंदर रंग दिला आहे आणि जेव्हा त्याला गंज चढतो, तेव्हाच्या छटा तर अप्रतिम असतात,' तुषार म्हणतात.

कलेच्या बाबतीतही मोठ्या भावाची दादागिरी चालते का? या माझ्या प्रश्नावर हलकेसे हसून ते म्हणाले,'आम्हा दोघांच्याही कामाचं स्वरूप पूर्णपणे वेगळं आहे. आम्ही दोघेही एकमेकांच्या कामात ढवळाढवळ करत नाही.' प्रशांतचे काम काहीसे कन्सेप्चुअल आहे. त्यांच्या कलाकृती या काहीशा अपूर्ण भासतात. तर तुषार यांचे काम हे पक्षी, प्राणी यांच्या भवताल फिरणारे आहे. आपल्या आजूबाजूला निसर्गातील घटकांच्या भावना अलगद टिपणं, हे त्यांचे स्वभाव विशेष! त्यांच्या कलेतही हे पूर्णपणे प्रतिबिंबित होतात. त्यांच्या या कलाकृतींचे पहिले प्रदर्शन भोपाळमध्ये आयोजिण्यात आले. भोपाळला शिलादित्य वर्मा यांची एक आर्ट गॅलरी आहे. प्रशांतजी सांगतात,'माझा मित्र मोहन शिंगणे जो स्वतःही एक कसलेला कलाकार आहे त्याचे आमचा यशात एक महत्त्वाचे योगदान आहे. त्याने आमच्याकरिता तिथे शिफारस केली. एका चित्रकाराच्या पेंटिंग्स आणि आमचे स्क्लपचर्स यांचा ग्रुप शो आयोजित होता. आम्हाला तर या कलाकृती कशा अरेंज करायच्या? याची देखील कल्पना नव्हती. आम्ही आपलं घरच्या दिवाणखान्यात वस्तू मांडून ठेवाव्यात, तशा कलाकृती मांडून ठेवल्या. मग वर्माजींच्या आई तिथे आल्या. ते सर्व बघून त्यांनी अक्षरशः पदर खोचला आणि कामाला लागल्या. त्या अगोदर त्यांनी आम्हाला भोपाळ शहर फिरायला पाठवून दिले. परत येतो तो काय माझाच माझ्या डोळ्यावर विश्वास बसेना इतक्या सुंदर आमच्या कलाकृती ठेवलेल्या होत्या. हळूहळू तिथे लोकांची गर्दी जमली. आम्ही हाताची घडी घालून एका कोपऱ्यात उभे होतो. मग अक्षरशः आमच्यावर कौतुकाचा वर्षाव झाला.'

कला क्षेत्रातील कुठलीही पदवी या दोन्ही भावांकडे नाही पण साक्षात सरस्वतीचे वरदान त्यांना प्राप्त आहे. ते शिकताशिकताच शिकत गेले. सुरुवातीच्या दिवसातील काही वाईट अनुभवांबद्दलही ते बोलतात की, नवोदित असताना एकदा एका कार्यक्रमाचे आमंत्रण घेऊन ते एका मोठ्या आर्टिस्टकडे गेले तर त्यांनी चक्क तुम्ही स्वतःला समजता तरी काय? तुमच्याकडे कुठलीही डिग्री नाही. मग तुमचं काम कसं असेल? असे म्हणत त्यांचा अपमान केला. पण, प्रत्यक्षात त्यांच्या कलाकृती बघितल्यावर मात्र प्रांजळपणे आपली चूक कबूलही केली.

तुषार यांना लोखंडाच्या एका तुकड्यात एका जखमी पक्ष्याची कलाकृती गवसलेली होती. त्यात निसर्गाची कमाल अशी की लोखंडाला जंग लागून जो नैसर्गिक रंग तयार झालेला होता त्याने त्या कलाकृतीला एक अप्रतिम सौंदर्य बहाल केले. एकदा एका प्रदर्शनात एका कवयित्री आल्या.त्यांना त्या कलाकृतीकडे बघून रामायणातील रावणाच्या बाणाने जखमी झालेला जटायू पक्षी आठवला. त्याच्यावर अप्रतिम कविता रचून, तिथे ती सादरही केली. त्याच प्रदर्शनात एक गृहस्थ आले त्यांच्या आजूबाजूला बॉडीगार्डस् होते. त्यांनी साऱ्या कलाकृती निरखून पाहिल्या आणि आर्टिस्टविषयी चौकशी केली. तुषारला बोलवण्यात आले. त्यांनी तुषारचा हात धरला आणि म्हणाले 'आपके हाथ मे जादू है' पुढचे तास दोन तास ते त्या प्रदर्शनात फिरत राहिले पण, त्यांनी तुषारचा हात काही सोडला नाही. नंतर कळले की ते चक्क भोपाळचे कलेक्टर होते. एका कलाकाराला आणखी काय हवं असतं! तुषार भावूक होऊन म्हणतात. त्यांनी बोल्ट आणि रॉडपासून एक वासरू तयार केलं होतं. वासरू जसं उड्या मारतं नेमकं ते स्वरूप त्या कलाकृतीत उतरलं होतं.

एकदा आर्टिस्ट सेंटर मुंबई येथे त्यांचा शो होता. नेहमीप्रमाणे मित्रमंडळींकडून वर्गणी गोळा करून ते तिथे गेले. तिथे सिंगापूरचे एक जोडपे आले. त्यांना प्रशांत यांची एक कलाकृती इतकी आवडली की, ती त्यांनी चक्क पन्नास हजाराला विकत घेतली. अशाप्रकारे उपाशी असताना केलेल्या एका कलाकृतीने या भावंडांच्या जगण्याची सोय मात्र केली.

कलाकृती घडविण्याबरोबरच आपल्या कलेचा वारसा नवीन पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम हे बंधू करतात. फाईन आर्ट, आर्किटेक्चर तसेच अनेक शाळकरी विद्यार्थ्यांना भंगारातून व्हिज्युअल आर्ट घडवण्याचे प्रशिक्षण दिले. जवळपास हजार बाराशे विद्यार्थी यांनी प्रशिक्षित केले आहेत. अहमदाबाद येथे सेप्ट नावाच्या विद्यापीठात वर्षातून दोनदा ते प्रशिक्षण देण्याकरिता जात. माईंड ट्री स्कूल (अंबाला), सांगाई स्कूल, गेटवे कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, सोनीपत, मणिपाल युनिव्हर्सिटी अशा अनेक ठिकाणी तुषार यांनीही त्यांना या कामात सोबत केलेली आहे. ते मुलांना भंगाराच्या ढिगापाशी घेऊन जातात व त्यातून वेगवेगळे आकार शोधायला सांगतात. ही क्रिया तितकीशी सोपी नसते. काही मुलांना चार-पाच दिवस काहीच गवसत नाही. पण, हळूहळू त्यांची नजर तयार होते. त्यांच्या विद्यार्थ्यांनीही अनेक सुंदर कलाकृती तयार केल्यात. यांच्या कामाचे वैशिष्ट्य हे की, ते कधीही कुठलेही स्केच काढत नाहीत. अगदी कमीत कमी वस्तू वापरून ते काम करतात. ते कुठल्याही वस्तूला कधीच आकार देत नाही. त्याच्या त्याच्या नैसर्गिक आकारातच ती कलाकृती घडते. त्या भंगारातील वस्तू जणू त्यांच्याशी बोलतात. त्यांनी खुंटीला बांधलेल्या एका बैलाची कलाकृती घडवली आहे. त्याला कुठल्याही दोरीने बांधले नाही पण तो एकाच जागीच स्तब्ध उभा आहे. अगदी चाकोरीत फिरणाऱ्या माणसासारखा! त्याला एक पाय, एक शिंग नाही. जणू आयुष्याची अपूर्णताच बैलाच्या रूपात एक प्रतिक म्हणून आपल्यासमोर उभी राहते. त्यांची एक विशेष कलाकृती म्हणजे एक वाट पाहणारी स्त्री! ती भावमुद्रा त्यांनी एका मोठ्या अडकित्त्यातून साकारली आहे. गाडीच्या शॉकपमधून एक डान्सिंग कपल त्यांनी घडवले आहे. एक लोखंडी पकड, एक अँगल आणि वेल्डिंग करताना टेस्टिंगसाठी वापरलेल्या एका लोखंडी तुकड्यापासून त्यांनी एक मातृत्वाच्या उंबरठ्यावर उभी असलेली स्त्री साकारली आहे. कारच्या इंजिनचा काही भाग वापरून त्यांनी एक अतिशय खेळकर व मस्तीखोर हत्तीचे पिल्लूदेखील बनवले आहे. कुठलीही मोडतोड, काटछाट किंवा कृत्रिम रंगरंगोटी त्यांच्या कामात दिसत नाही. या कलाकारांच्या मनातील सच्चेपणा जणू त्यांच्या कलाकृतींमध्ये उतरला आहे.

आयुष्यात ठरवून काहीच होत नाही. आहे हे असे आहे, आता यातून जे काही शक्य होते ते करा, असं आयुष्य आपल्याला शिकवतं. या दोन्ही भावांचं कार्य हे जणू आयुष्याचे प्रतिबिंबच नाही का? अशा प्रकारच्या कलाकृतींच्या बरोबरीनेच केवळ नागपुरातीलच नाही तर विदर्भातील अनेक शहरांमध्ये उभ्या असलेल्या मोठमोठ्या धातूच्या प्रतिकृती या भावंडांनी घडविल्या आहेत. या कार्यात त्यांना उदंड यश आणि कीर्ती मिळो अशी ईशचरणी प्रार्थना!

## विशेष

रश्मी वाघमारे / ८६००२७७८८८

# मन वढाय वढाय



गुरु माऊलीचा धीर गंभीर आवाज घुमू लागला. मानव म्हणजे मन असलेला, मनन आणि विचार करणारा प्राणी! मनुष्य आपल्या मनाचा उपयोग करू शकला तर साक्षात परमेश्वर स्वरूप होईल. संत-महंत या मनाला ओळखून त्याद्वारेच देवपदाला पोहोचलेत. मन म्हणजेच संसार बंध आणि मोक्ष मनामुळेच!

**मन कल्पित संसार जाण,**
**मनी कल्पिले जन्म मरण**
**संसार चक्री आवर्तन,**
**मनास्तव जाण पुन्हा पुन्हा**

मनुष्याचे व्यापार पाच कर्मेंद्रिय व पाच ज्ञानेन्द्रिय यांच्या योगाने होतात. त्यांचा एक प्रेरक स्वामी आहे. ही ज्ञानेंद्रिय व त्यांच्या देवता मनाच्या अधीन आहेत. एखादा पराक्रमी सिकंदर सारे जग जिंकेल पण मनाला जिंकणं अत्यंत कठीण आहे. मन, बुद्धी, चित्त व अहंकार ही कार्यपरत्वे मनालाच दिलेली चार नावे आहेत. वृत्तीच्या या चार मनोदेवता प्रसन्न झाल्या की, मोक्ष सिद्ध आहे. म्हणून तुकोबाराय सांगतात,

**मन करा रे प्रसन्न,**
**सर्व सिद्धीचं कारण।**
**मोक्ष अथवा बंधन**
**सुख समाधान इच्छा ते॥**
**म्हणून मनाला प्रसन्न**
**करून घेणं अगत्याचं आहे...**

सुमित्राचे डोळे ओथंबले. गुरु माऊलींनी किती छान आणि सोपं करून सांगितले, किती बिकट अवस्था घेऊन मी या पवित्र आश्रमात प्रवेश केला. आता माझी नजर स्वच्छ अन् माझं मन निरभ्र झालं आहे. हे ऐहिक पाश व त्याचा अनिवार गुंता सुटू पाहतो आहे. मी आता जे काही होईल त्याला योग्य रीतीने समोर जाणार आहे. गेली चार वर्षे ती कष्टप्रद वास्तविकतेने होरपळली होती. कोरोनाचा तो भयंकर काळ!

माझ्या प्रिय पतीला या भयंकर रोगाची लागण झाली आणि त्यांना अकाल मृत्यू आला. परगावहून कामानिमित्त आलेल्या माझ्या लाडक्या लेकाला श्रीनाथलाही पछाडले या महामारीने! पाच दिवसांच्या झुंजीनंतर तो अखेरीस त्याचा ही बळी गेला. त्याचा मृत्यू मला पार उध्वस्त करून गेला. माझ्या सासूबाईही हा जबरदस्त धक्का सहन न होऊन शांत झाल्या. मागे राहिले मी, माझी तरुण अकाली एकाकी झालेली सून आणि सात वर्षांचा एक नातू! माझं हृदय आक्रंदन करू लागलं. कशी जगू मी, कुणासाठी? एक एक करून माझी लाडकी माणसं मला सोडून गेली.

माझ्या मुलाने कर्नाटकी मुलीशी प्रेम विवाह केला होता. ती आपल्या आईवडिलांची एकुलती एक असल्यामुळे ते तिला ताबडतोब घरी घेऊन गेले. मी ही त्यांच्या मागे धावले. त्या दोघांना मदत करण्यासाठी उपरी होऊन बसले, त्या अनोळखी प्रदेशात! मी अगदी एकटी पडले तरीही स्वतःला कसे बसे त्या सर्वांमध्ये सामावण्याचा प्रयत्न करू लागले.सगळे निर्णय आता इतर मंडळी घेऊ लागली, विशेष करून विहीण बाई!

सर्वांचे एकमत झाले आणि आमचे राहते घर विकून टाकण्याचा निर्णय झाला. सौदा पक्का झाला पण, मन विषण्ण झालं. ही वास्तू उभारण्यासाठी केलेले कष्ट आठवले. माझी शिक्षिकेची आणि ह्यांची खाजगी नोकरी! वेगवेगळ्या घाटाची सुंदर भांडी जमविली होती. तो मोठा पितळी देव्हारा ज्यात आमच्या अनेक पिढ्यांनी पूजा केलेले देव होते. त्या आठवणींचा पसारा कसा आवरायचा? हे ओढाळ मन कसं ताळ्यावर आणायचं, हे काही केल्या कळेना.

आता हे सारं काही आवरायचं किंवा कुणाला तरी देऊन टाकायचं आहे. माझा जीव अडकलाय या साऱ्यामध्ये! तिची फार इच्छा होती की, किमान दोन खोल्या स्वतःसाठी ठेवाव्या नगरच्या घरात! कधीतरी यावं, इथल्या जुन्या आठवणीत रमावं, मैत्रिणींना भेटावं, मनसोक्त गप्पा कराव्यात, पण...! हा पण किती कठीण होता, हे जाणवायला लागलं होतं हल्ली! 'आता या वयात एकटीने बंगलोर ते नगर एवढा मोठा प्रवास होणार आहे का?' अशा विहिण बाईंनी केलेल्या प्रश्नावर ती गप्प बसली. त्यांचंही म्हणणं बरोबरच होतं. पण हे मन? याला कसे समजावयाचे? इथल्या वास्तूमध्ये माझे मन गुंतले आहे, मनाचा पसारा कसा आवरू?

सासू सासरे, दीर नणंद असं भरलेलं कुटुंब! मोठी सून म्हणून सर्व कर्तव्य पार पाडू लागली. स्वतःची दोन मुले, आला गेला, पै पाहुणा, सणवार, एक ना दोन! अखंड आहुती सुरू होती गृह यज्ञामध्ये! मुलांची शिक्षणं, लग्नसोहळे पार पडताना केसात चंदेरी बटा दिसू लागल्या. कुटुंब हेच जग झाले तिचे! ती वर्तमानात परतली.

सून सुवर्णलता फिजीओथेरपीस्ट! ती सकाळी कामावर निघायची. लहानगा नातू शाळेत जाणारा आणि ती घर सांभाळून स्वतःला त्या नव्या वातावरणात सामावून घ्यायचा प्रयत्न करीत असे. भरीस भर म्हणजे तिचा एक मामेभाऊ होता जो काहीच करत नसे. त्याची बायको आणि दोन मुले बरेचदा तिच्या घरी मुक्कामास असत.

सतत दूर राहिल्यामुळे सुनेला आणि नातवालाही तिचा लळा नव्हता. खरं तर घर आवरायला म्हणून ती नगरला आली होती. आता शेवटचे काही दिवस या घरावर, तिथल्या स्मृतींवर मायेचा हात फिरवून हे बंध मोकळे करायचे असा विचार होता.

कुणीतरी गुरू माऊलींच्या दर्शनास जाण्याचा सल्ला दिला आणि ती ह्या आश्रमात आली. सुरवातीला खूप कठीण गेले. मात्र रोजची प्रवचनं, उद्बोधनं आणि नियमित दिनचर्या ऊर्जा देऊन गेली. जे समोर येईल त्यास तोंड देण्यास ती तयार झाली. आहे त्या परिस्थितीचा स्वीकार करून ती आता स्वतःची चौकट जपते आहे. इतरांसाठी जगताना स्वतःला काय हवं ते निश्चित करणार आहे. मनावरचं मोठं ओझं कमी झालंय आणि प्रसन्न वाटतंय!

## भयकथा

श्रेया सरनाईक / ८६००२७७८८८

# रिंगा रिंगा रोझेस




रुथने काहीही विचार न करता झटकन कोटाच्या खिशातून रेशमी रुमाल काढला आणि तिच्या जखमी हाताभोवती घट्ट बांधून दिला. तरुणीच्या ओठांवर क्षणात प्रसन्न हास्य उमटलं.

ती हलक्या आवाजात म्हणाली, तुम्ही शिकवलेले सगळे टेबल मॅनर्स मी नक्की लक्षात ठेवेन. अचानक रक्त निघालं की थोडं घाबरल्यासारखं वाटतं, खरं सांगायचं तर! पण थोड्या वेळात बरं वाटेल. असं रक्त-वित्त पाहायची सवय नाही मला. अपघातात रक्त-मांसाचा चिखल होतो म्हणे. पोलिस कसं काय पंचनामा वगैरे करतात, देव जाणे!'

किियारा, मलाही रक्ताची खूप भीती वाटते'' रुथ हळू आवाजात म्हणाली. 'अपघाताची, पाण्याची, आगीचीः चटक्याची!''

'आणि भुताची? आत्म्याची?'' कियाराने डोळे विस्फारत विचारलं.

'छ्या! त्याची तर मला अजिबात भीती वाटत नाही.'

''मिसेस मायकेल, मला तर 'भूत-आत्मा' हा शब्द जरी उच्चारला तरी अंगावर काटा येतो. अक्षरशः घाम फुटतो.' ती बोलत असतानाच थंडीतही तिचा चेहरा घामाघूम झाला होता.

रुथ तिच्याकडे एकटक पाहत राहिली. तिच्या हालचाली अतिशय डौलदार, मोहक होत्या. मायकेल सोबत नाही, याचं तिला नकळत समाधान वाटलं. खरंच, कुणीही हिच्या प्रेमात पडेल अशीच आहे ही आकर्षक, आणि धोकादायक वाटावी इतकी मोहक.

मायकेलची आठवण अचानक मनात चमकून गेली. त्याने दिलेला रेशमी रुमाल आपण हिला दिलाय, हे लक्षात आलं. पण रक्ताने माखलेला रुमाल परत मागणं विचित्र दिसेल.असू दे. तिच्याचकडे राहू दे.'केस बांधल्यावरही छानच दिसतेस तू,' रुथ म्हणाली.

'अगं, कुठे निघालीस?''

कियारा हसत म्हणाली,'इथे दारात जाऊन उभी राहते. थोड्याच वेळात स्टेशन येईलच. थोडी गार हवा लागली की बरं वाटेल.'

ती बोलत बोलत पुढे चालू लागली. हातातली वेताची बास्केट मात्र तिने घट्ट पकडून ठेवली होती. 'छान वारा लागतोय. मिसेस रुथ, या ना तुम्हीही इथे.' रुथला आग्रह मोडवेना. रुथ तिच्यापासून थोडे अंतर राखून उभी राहिली. तिच्या हातातील त्या टोपलीत नेमकं काय असेल, याची उत्सुकता तिच्या मनात चाळवली जाऊ लागली. तेवढ्यात एक समुद्रपक्षी त्यांच्या अगदी जवळून फड्फफडत गेला. 'ए बाई कियारा, अशी वाकून नको ना बघू.' 'घाबरू नका, मिसेस रुथ. पुढचं स्टेशन किती दूर आहे ते बघतेय.' 'अगं, स्टेशन जवळ आलं की पाट्या लागतातच. खरंच नको वाकून बघू. तुझी टोपली बघ, कशी हेलकावत आहे. मला भीती वाटतेय.''

'पण मला अजिबात वाटत नाही,'' ती थंड, निर्विकार आवाजात म्हणाली. रुथच्या मनात विचार चमकून गेला'. हिचा आवाज असा अचानक वेगळाच का वाटतोय? वाऱ्यामुळे असेल कदाचित. 'तुला खरंच भीती नाही वाटत, कियारा?''नाही. कारण, मी शंभर वर्षांपूर्वी एकदा उडी मारली आहे.' रुथ तिच्याकडे पाहतच राहिली. ती काय बोलतेय, हे उमगायला तिला काही क्षण लागले.

वेताच्या टोपलीत काहीतरी हललं. वाऱ्याच्या झोताने त्यावरचा मखमली पांढरा कपडा उडून गेला. आत एक छोटे बाळ होतं. त्याच्या हातात मातीचं कसलंसं खेळणं होतं. ते बाळ न चुकता, निर्विकार नजरेने रुथकडे पाहत होतं. क्षणभर सगळं स्तब्ध झालं. काहीतरी भयंकर घडणार, याची जाणीव होताच रुथच्या तोंडून किंकाळी फुटली. त्याच क्षणी त्या तरुणीने रुथवर झडप घातली. तिच्या मजबूत, अमानवी हातांचा विळखा रुथच्या गळ्याभोवती घट्ट आवळला गेला. ते हात मानवी नव्हते. प्रचंड, निर्दयी शक्तीने भरलेले.

दोन्ही हात एकत्र करून रुथने प्रतिकार करण्याचा शेवटचा प्रयत्न केला. तिने तिच्या चेहऱ्यावर नखं रोवली. त्या झटापटीत त्या तरुणीच्या मिंक कोटची वरची तीन बटणं उघडली गेली. ती गाणं गुणगुणू लागली

''रिंगा रिंगा रोझेस...पॉकेट फुल ऑफ पोझेस...''

गाण्याच्या तालावर तिने रुथच्या हातातील ते खेळणं ओढून घेतलं. त्याच्या टोकाने तिने रुथच्या छातीवर सुरीसारखं कोरणं सुरू केलं. गरम लोखंडी सुरी छातीत रुतवली जात असल्याचा भास रुथला झाला. तिचा श्वास अडखळला. शरीर शिथिल पडू लागलं. रूथने आचकी दिली. श्वास थांबला. मायकेल...मायकेल बोल ना माझ्याशी...मायकेल गाढ झोपेत असतानाच त्याच्या कानांवर तो अस्पष्ट, कंप पावणारा आवाज आदळला. रुथ आली? एवढ्या लवकर?

मी स्वप्नात आहे का? की ती अर्ध्या रस्त्यातून परत फिरली?ओह, रुथ! शेवटी तू माझं ऐकलंस. पण माझं डोकं इतकं भयंकर का दुखतंय? रुथ, तू आलीयस. थांब. मला दरवाजा उघडायला हवा.'रुथ डार्लिंग पुन्हा मला सोडून कधीच जाऊ नकोस.' मायकेल धडपडत उठला. खोलीत गडद अंधार पसरला होता. मेणबत्त्या वाऱ्याने केव्हाच विझल्या होत्या. बाहेर जाण्याचा रस्तासुद्धा त्याला दिसत नव्हता. त्याने घाईघाईने माचिस ओढली आणि मेणबत्ती पेटवली. समोरचं दृश्य पाहून मायकेलची दातखिळ बसली. आवाज बाहेरून नव्हे, तर प्लॅन्चेट बोर्डमधून येत होता.'रुथ?' 'मायकेल मी चुकले रे. मला माफ कर.' अक्षरं थरथरत उमटत होती.'मी आता जिवंत नाही. तुझं म्हणणं खरं ठरलं. सारं खरं आहे, मायकेल. मी तुला फक्त एवढंच सांगायला आले आहे की माझं तुझ्यावर फार, फार प्रेम आहे. मी चुकले. मला क्षमा कर.'

मायकेलने तो बोर्ड छातीशी घट्ट कवटाळला आणि मोठ्याने रडू लागला. इतकं असहाय्य त्याला आयुष्यात कधीच वाटलं नव्हतं. रुथच्या आवाजालाच मिठी मारावी, असं त्याला वाटलं.

तो बोर्ड छातीशी धरून व्हरांड्यात आला. अतिश्रम आणि अचानक बसलेल्या मानसिक धक्क्यामुळे मायकेल व्हरांड्यातच कोसळला. सकाळी दहा वाजता मेड आली. गेट ओलांडून व्हरांड्यात पाऊल टाकताच तिने किंकाळी फोडली. एका बाजूला मायकेल प्लॅन्चेट बोर्ड छातीशी कवटाळून खाली पडलेला होता. तिने आरडाओरडा करत आजूबाजूच्या लोकांना बोलावलं. फॅमिली डॉक्टर आले. श्वास चालू होता, पण डोक्याला गंभीर दुखापत झाली होती.

त्या उपनगरात ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात हेडलाईन झळकलीङ्घ ङ्कब्लडमूर स्टेशनवर महिलेचा संशयास्पद मृत्यू!ङ्घ खाली तपशील दिले होते. प्रेत ताब्यात घेण्यासाठी पोलिसांशी संपर्क साधावा. मायकेलची प्रकृती जवळपास आठवडाभर सुधारलीच नाही. त्याच्या मित्रांनीच रुथच्या प्रेतावर अंत्यसंस्कार केले.

मायकेल अजूनही पूर्णपणे सावरला नव्हता. जे घडलं, त्याचा प्रचंड मानसिक धक्का त्याला बसला होता. रुथ जिवंत नाही, यावर विश्वास ठेवणं त्याला असह्य वाटत होतं. काही दिवस गेले. मायकेल अत्यंत अशक्त झाला होता. एके दिवशी बेल वाजली. दारात पोस्टमन उभा होता. दुःख व्यक्त करणाऱ्या अनेक तारा आणि पत्रं येत होती.

एका पत्रातील अक्षरं अत्यंत बारीक होती. भिंग समोर धरून त्याने वाचायला सुरुवात केली, डिअर मायकेल डोरोथी, माझी भाची नैन्सीकडून रुथच्या निधनाची बातमी कळली. कळल्यापासून मन स्थिर नाही. खूप वाईट वाटलं. माझ्याशिवाय तुझं सांत्वन कोण करणार? मी तुला भेटायला येतो आहे.

रुथ मला मुलीसारखीच होती. माझ्यासारख्या ऐंशी वर्षांच्या म्हाताऱ्याला सोडून काळाने तिच्यावरच का झडप घातली, ते समजत नाही. परमेश्वराची इच्छा! मी तुझ्या दुःखात सहभागी आहे. परमेश्वर रुथच्या आत्म्याला शांती देवो.

तुमचा काका
जॉन क्रांबवेल

पत्र हातातून गळून पडलं. तेवढ्यात प्लॅन्चेट रूमकडच्या व्हरांड्यातून एक कागद हवेत भिरभिरत आला. त्यावर लिहिलं होतं, रिंगा रिंगा रोझेस...एक थंड लहर मायकेलच्या अंगातून गेली.

*(कथा समाप्त)*

## काही असं, काही तसं

ज्योती पुजारी / ९७६५०३१४३५

# आम्ही मागासलेलेच...



'हा कसला फोटो गं?'

मैत्रिणीच्या घरात वरच्या मजल्यावर जाणाऱ्या पायऱ्यांच्या बाजूला लावलेल्या फोटोकडे पहात मी विचारलं. त्या फोटोत फक्त काही रेषा दिसत होत्या. 'हा आमच्या बाळाचा फोटो', म्हणत मैत्रीण हसली 'हा असा ?बाळ म्हणजे तुझा नातू तर छान गुटगुटीत लोभस आहे आणि या फोटोत तर...'

मैत्रिणीने मला मध्येच थांबवलं.'अग तो बाळाच्या जन्माच्या आधीचा फोटो आहे. बाळ पोटात असताना केलेल्या सोनाग्राफीचा फोटो आहे.' सोनोग्राफीचा फोटो? हौशी आईवडिल बाळाच्या जन्मापासूनचे फोटो काढतात हे माहिती होतं पण बाळाच्या जन्माच्या आधी केलेल्या सोनोग्राफीचे फोटो असे फ्रेम करून घरातल्या भिंतीवर लावलेले मी पहिल्यांदाच पहात होते. 'बघ, लबाड कसा हसतो आहे.'

आईच्या पोटातलं बाळ आतून आईला पोटातून ढुशा देत असतं पण पोटात बाळ रडतं, हसतं? नवाच शोध मला लागला. सोनोग्राफीत बाळाची आकृती दिसत होती पण, ते हसतंय हे मला दिसलं नाही. मला मैत्रिणीची कमाल वाटली. मैत्रिणीने तिच्या मोबाईलमध्ये कसलंतरी रेकॉर्डींग सुरू केलं. काहीतरी लबडब आवाज यायला लागला. 'हा कसला आवाज? कशाच रेकॉर्डिंग आहे गं?' मी विचारलं.

'फिटल मॉनिटरचे ठोके आहेत अगं! बाळाच्या आईला तपासताना ऐकले अन् मी रेकॉर्ड केले,' इति मैत्रिण! 'ते कशाला रेकॉर्ड केले?' 'अगं मुद्दाम रेकॉर्ड केले. बाळ मोठं झालं की, त्याला ऐकवता येईल नं! हाऊ फनी...' मैत्रिण म्हणाली. 'खरंच फनी,' मलाही ते फनी आता 'फनीच' वाटायला लागलं.

'थांब, तुला बाळाच्या बारशाचा व्हिडीओच दाखवते,' ती उत्साहाने म्हणाली. आम्ही दोघी कोचावर बसलो.'व्हिडीओपक्षा फोटो बरे! फोटोंचा अल्बम असला की वेळ मिळेल तेव्हा कधी कुठेही पाहता येतो.' मी एक नंबरची अडाणी आहे हे मैत्रिणीच्या पुढच्या वाक्याने मला कळलं.

'ती आता ओल्ड फॅशन झाली. पण आम्ही बाळाचे काही फोटो काढले आहेत. ते बघ, मग मी बारशाचा व्हिडीओ लावते.' मैत्रिणीने एक जाडजूड अल्बम माझ्या हातात ठेवला. माझ्या शेजारी बसून तिची रनिंग कॉमेन्ट्री सुरू झाली. कोणता फोटो केव्हा काढला वगैरे! बाळ खरेच खुपच लोभस होते. 'हा कसला फोटो गं!''ओळख बघू,' मैत्रिण गालात हसत होती. मी फोटो निरखून पाहिला.'काही कळत नाही. आता तूच सांगून टाक कसला फोटो आहे,' मी !'तो ना आमच्या पपीच्या नाळेचा फोटो आहे.'

'कशाचा फोटो आहे? मला वाटलं मी काही चुकीचं ऐकलं की काय! पपी म्हणजे तुझ्या त्या कुत्रीचा, तिला केव्हा पिल्लं झाली? तू त्यांच्या नाळेचे फोटो...' मैत्रिण मध्येच कडकडली. 'ए मॅड! पपी म्हणजे कुत्री नाही. पपी म्हणजे आमचा नातू पुष्पेन्द्र! त्याला आम्ही लाडाने पपी म्हणतो. त्याच्या नाळेचा हा फोटो नाळ, जमिनीत पुरण्याआधी मी काढला. अगं पहिल्या लेकराचं सगळंच कौतुकाचं असतं.'

'हो का! बरं झालं बाई, तू बाळाच्या पहिल्या शी चा फोटो काढला नाहीस, मी उपरोधानं म्हणाले.'काढणार होते गं! पण, बाळाला पहिली शी झाली तेव्हा मी घरी आले होते नं,' ती अगदी गंभीरपणे हळहळत होती. मला हसावं की रडावं कळेना.

'हा फोटो खरंतर लॉकेटमध्ये ठेवायला हवा अन् ते लॉकेट बाळ मोठा झाल्यावर त्याच्या गळ्यात घालायचं,' मी उपरोधानं म्हणाले. 'किती छान! मस्तच कल्पना आहे तुझी,' तिला माझा उपरोध कळलाच नाही. मी मनातल्या मनात कपाळावर हात मारला. 'हो, तु मला फोटो पाठवले होतेस. छानच झालं असणार बारसं!' 'तू तुझ्या लेकाकडे अमेरिकेला जाउन बसलीस. माझ्या सुनेचं बेबी शॉवर, बाळंतपण, बारसं सगळं मिस केलंस तू, मैत्रीण जरा रूसक्या आवाजात म्हणाली .

'हो ना गं! पण, त्याचा हट्टच होता. त्यानं तिकीटच पाठवली ना!खूप दिवसात आमच्या नातवांनाही पाहिलं नव्हतं.' 'असू दे गं! मी तुला फोटा दाखवतेय ना! हा बघ माझ्या सुनेच्या बेबी शॉवरचा फोटो,' मैत्रीण म्हणाली. 'बेबी शॉवर म्हणजे डोहाळजेवण नं,' मी!

'हो गं बाई! तुला बेबी शॉवर माहित नाही. एवढी अमेरिकेत राहून आलीस आणि तुला एवढही माहिती नाही,' मैत्रिणीने मला मुर्खात काढलं. बेबी शॉवर म्हणजे डोहाळजेवण हे मला माहित आहे. पण, इतका छान अर्थपूर्ण शब्द असताना आपण उगाच दुसऱ्याची उसनवारी का करायची,' मी माझा स्पष्ट मत मांडलं. तिने ते कानांवरही घेतलं नाही. तोपर्यंत माझ्यासमोर व्हिडीओ लागला होता.

व्हिडीओत तिची गर्भभारानं जडावलेली सुन फुलांनी सजवलेल्या पाळण्यावर बसली होती. तिच्या बाजूला 'मी बाळाचा बाबा' असा फलक घेऊन मैत्रिणीचा मुलगा उभा होता. मैत्रिणीच्या हतात एक फलक होता. त्यावर 'मी बाळाची आजी' असं लिहिलं होतं. तिच्या पतीराजांच्या हातात 'मी बाळाचे आजोबा' असा फलक होता .

'हे फलक कशासाठी बाळाचा बाप, आजी, आजोबा कोण आहे, हे तिथे जमलेल्या तमाम जनतेला माहित आहे. मग मुद्दाम सांगण्याची गरज काय?' मी आपली शंका प्रामाकिणपणे विचारली.

'तू अगदी मागसलेली आहेस. तुला दोन नातू होऊनही काहीच माहित नाही.' मैत्रीण जरा नाराज झाली पण मी खरंच मागासलेली आहे. गरोदर बायकोच्या उभारलेल्या पोटावर हात फिरवत, लवकरच मी बाबा होणार अशा रील्स पाहताना मला नवल वाटतं. चारचैघात गरोदर बायकोच्या पोटावर हात फिरवणं, तिच्या पोटाला कान लावून बाळाची हालचाल ऐकणं याला पुढारलेपण म्हणायचं का! दोन नातू होऊनही मला हे कळलंच नाही. मला माझे 'भरलेले दिवस' आठवले अन् सुनेचेही! जाणवलं की, आम्ही खरंच मागासलेले आहोत.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# विद्यार्थ्याचा विद्यार्थ्यावर चाकू हल्ला

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ ऑगस्ट -**

क्षुल्लक कारणावरुन दोन विद्यार्थ्यांनी एका विद्यार्थ्यावर चाकू हल्ला केल्याची घटना आज दि.३ ऑगस्ट रोजी सकाळी दहाच्या सुमारास शहरातील असर्जन येथील श्री शंकरराव चव्हाण विद्यालयासमोर घडली. जखमी विद्यार्थ्याला तातडीने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले.

आज दि.३ ऑगस्ट रोजी नेहमीप्रमाणे शाळेची मध्यंतर झाल्यानंतर सर्व विद्यार्थी जेवण करत असताना शाळेच्या बाहेर गेलेल्या महावीर धुमाळ याच्यावर त्याच्याच वर्गातील दोन विद्यार्थ्यांनी चाकू हल्ला केला. यावेळी परिसरातील काहींनी तातडीने हि मारहाण रोखण्याचा प्रयत्न करत जखमी महावीर धुमाळ यास शासकीय रुग्णालयात हलविले. दरम्यान जखमी महावीर धुमाळ व मारणारे दोघे अल्पवयीन आहेत. घटनेची माहिती कळताच ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्यासह पथकाने घटनास्थळी धाव घेतली. वृत्त लिहिपर्यंत या प्रकरणाची नोंद करण्याची प्रक्रिया सुरु होती.

## व्यंकटराव वळगे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

**बाऱ्हाळी**-बाऱ्हाळी येथील विद्या विकास विद्यालयाचे ज्येष्ठ कर्मचारी, पत्रकार तथा माजी उपसरपंच व्यंकटराव खंडेराव वळगे हे नियत वयोमानानुसार प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्या अनुषंगाने भाऊसाहेब देशपांडे मंगल कार्यालय बाऱ्हाळी येथे सेवापूर्ती सत्कार सोहळा कार्यक्रम घेण्यात आला. विद्या विकास विद्यालय बाऱ्हाळी येथे अनेक वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावत असताना व्यंकटराव खंडेराव वळगे हे दि. ३१ जुलै २०२६ रोजी सेवानिवृत झाले. त्यांनी विद्यार्थ्यांप्रती, पालकांप्रती तसेच गावकऱ्यांप्रती जिव्हाळ्याचे संबंध जपले. शिस्तप्रिय, कर्तव्यदक्ष आणि मनमिळावू स्वभावामुळे त्यांनी विद्यार्थी, शिक्षक, पालक व नागरिकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण करत आपल्या सेवाकाळात संस्थेच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देऊन शैक्षणिक कार्यात त्यांनी उल्लेखनीय भूमिका बजावली. शैक्षणिक क्षेत्राबरोबरच पत्रकारितेतही त्यांनी सक्रियपणे कार्य करत अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली आणि सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. सध्या बाऱ्हाळी ग्रामपंचायतीचे उपसरपंच म्हणून कार्यरत असून गावाच्या विकासासाठी विविध विकासकामे राबविण्यात त्यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांचा विविध स्तरांतून सत्कार व गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई देशपांडे, माजी आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटी जिल्हा उपाध्यक्ष राजन देशपांडे, सरपंच सौ. अंजलीताई देशपांडे, अरुण महाजन, प्राचार्य प्रा. शिरीष लव्हेकर, चेअरमन व्यंकट पाटील उमाटे, आनंद वळगे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पत्रकार बंधू, राजकीय क्षेत्रातील सहकारी आणि ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील आयुष्यासाठी निरोगी, सुखी व यशस्वी वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.



## ग्रा.पं. सदस्य सय्यद ईस्माईलसाब यांचा वाढदिवस उत्साहात

**नरसी** -नायगाव तालुक्यातील नरसी येथील भारतीय जनता पक्षाच्या संपर्क कार्यालयात ग्रामपंचायत सदस्य सय्यद ईस्माईलसाब यांचा वाढदिवस रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भारतीय जनता पक्षाचे नेते तथा नायगाव पंचायत समितीचे माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवर, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या. सय्यद ईस्माईलसाब यांनी ग्रामपंचायत सदस्य म्हणून गावाच्या विकासकामांमध्ये सक्रिय सहभाग घेत जनसामान्यांच्या प्रश्नांबाबत सातत्याने पाठपुरावा केला आहे. सर्व समाजघटकांशी समन्वय राखत लोकाभिमुख कार्य करण्याची त्यांची शैली आणि सामाजिक उपक्रमांतील सहभाग याबद्दल उपस्थित मान्यवरांनी गौरवोद्गार काढले. आगामी काळातही त्यांनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी याच तळमळीने कार्य करत राहावे, अशा शुभेच्छाही यावेळी व्यक्त करण्यात आल्या. कार्यक्रमात श्रावण पाटील भिलवंडे यांनी सय्यद ईस्माईलसाब यांचा सत्कार करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. गावाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याची गरज त्यांनी यावेळी अधोरेखित केली. या प्रसंगी नरसी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन गजानन पाटील भिलवंडे, ज्येष्ठ पत्रकार गोविंद टोकलवाड, गंगाधर गंगासागरे, दत्ता पाटील होटाळकर यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर उपस्थितांनी सय्यद ईस्माईलसाब यांना निरोगी, दीर्घायुष्य लाभावे तसेच त्यांच्या सार्वजनिक व सामाजिक कार्याला अधिक बळ मिळावे, अशा मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या.

## आदमपूरात अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त ठिकठिकाणी अभिवादन

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील साठे चौकात स्थित लोकशाहीर,साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती स्मारकास सर्वप्रथम माजी सरपंच प्रतिनिधी अरविंद वाघमारे, देशोन्नती पत्रकार काशिनाथ वाघमारे व उपस्थित समाज बांधवांनी पुष्पहार अर्पण करीत वंदनीय अभिवादन केले. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच प्रतिनिधी कपिल भुसावळे व ग्रामपंचायत अधिकारी संभाजी हनवटे, जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक शेषराव पांचाळ व सर्व शिक्षक, महाळप्पा पटने विद्यालयात मुख्याध्यापक चंद्रशेखर लगडे व सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी, अंगणवाडीत नयना कुलकर्णी व त्यांच्या सर्व सहकारी सेविका, मदतनीस वरील सर्व कार्यालयीन स्थळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करीत सामुहिक अभिवादन करण्यात आले. तसेच सोशल मिडिया च्या सकारात्मक पद्धतीने युवक आणि सुजाण नागरिकांकडूनही विविध समाज माध्यम ग्रूपवर स्टेटस व पोस्ट,पोस्टर शेअर करीत अनोखे डिजिटलही अभिवादन करण्यात यंदा मोबाईल वापरकर्ते आणि अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे चिकित्सक वाचक,चाहते,कार्यकर्ते अग्रेसर होते.

## इस्लापूरमध्ये लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

**इस्लापूर** -समाजातील वंचित, शोषित आणि कष्टकरी घटकांच्या हक्कासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त इस्लापूर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या सभागृहासमोर ध्वजारोहण करून त्यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. दरम्यान, ग्रामपंचायत कार्यालय इस्लापूर येथेही लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रतिनिधी व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.या कार्यक्रमास स.पो.नि.रमेश जाधवर,काशिनाथ शिंदे,बालाजी धुरपडे,कॉम्रेड अर्जुन आडे,दत्ता गडलवाड, तुकाराम बोनगीर,नारायण शिंनगारे,प्रदीप डुडेल,विकास माहुरकर,प्रशांत डांगे,शंकर मुधोळकर,तोफिक पटेल,रवी कजबे,राहुल बनसोडे,लखन गडलवाड,राजु गडपाळे,भुजंग हाटेकर,लतीफ शेख,लक्ष्मण कासारे,नागनाथ यंपलवाड,सिद्धार्थ भेले,राघू वाघमारे,दिनेश डोंगरे,सुरेश झुरेकर,अवधूत सोळंके, मच्छिंद्र अनिलवाड तसेच पोलीस कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती कार्यक्रमाचे आयोजन कार्तिक सुंकलवाड यांनी केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि सामाजिक संदेश देणाऱ्या वातावरणात पार पडला.

# मुदखेड नगरपरिषदेचा भन्नाट इंजिनिअरिंगचा फार्मुला चर्चेत



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ३ ऑगस्ट -**

शहरातील कासार गल्ली भागातील रस्त्यावरील माजी नगरसेवक महावीर कंधारकर यांच्या घरासमोरील पाणीपुरवठ्याची पाईपलाईन तब्बल पंधरा दिवस फुटलेल्या अवस्थेत होती. त्यामुळे हजारो लिटर पिण्याचे पाणी रस्त्यावर वाया जात होते. या गंभीर प्रश्नाकडे काँग्रेस पक्षाच्या वतीने लक्ष वेधून घेण्यासाठी फोटो व व्हिडिओसह सोशल मीडियावर आवाज उठविण्यात आला होता त्यानंतर नगरपालिकेने या ठिकाणी जे काम केले, ते पाहून नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे. फुटलेला पाईप व्यवस्थित दुरुस्त करण्याऐवजी फक्त जोड लावून त्यावर मोठा दगड ठेवण्यात आला. ही कायमस्वरूपी दुरुस्ती नसून केवळ तात्पुरती मलमपट्टी असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

शहरातील नागरिकांचा प्रश्न आहे - नगरपालिकेकडे कुशल अभियंते आहेत की फक्त धोंडे ठेवण्याचे तंत्रज्ञान? पिण्याच्या पाण्यासारख्या महत्त्वाच्या विषयावर असा निष्काळजीपणा योग्य आहे का?

मुदखेड शहरात नगरपालिकेची निवडणूक झाल्यानंतर विकासकामांपेक्षा तात्पुरत्या उपाययोजनांचे प्रमाण वाढल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे अनेक नागरिक आता म्हणू लागले आहेत की, यापेक्षा पूर्वीचे प्रशासकीय राजच बरे होते का?

मुदखेड शहरातील सर्व पाणीपुरवठा पाईपलाईनची तातडीने तपासणी करून अशा तात्पुरत्या उपायांऐवजी दर्जेदार व कायम स्वरूपी दुरुस्ती करण्यात यावी. नागरिकांच्या कराच्या पैशातून होणारी कामे टिकाऊ आणि गुणवत्तापूर्ण असावीत हीच सर्वसामान्यांसह कांग्रेस पक्षाची मागणी आहे.

**विकासकामे केवळ दिखावा : गिरीष कोत्तावार**

मुदखेड शहरातील सत्तांतरानंतर झालेली कामे व होत असलेली कामे केवळ दिखावा असून केवळ विकासाचे गाजर मुदखेड वासियांना दाखवत आहेत सत्ताधाऱ्यांनी कामे करायचीच असतील तर चांगली व दर्जेदार करावी अन्यथा जनतेच्या कराचा पैसा वाया घालवायचा असेल तर कांग्रेस पक्ष कदापि खपवून घेणार नसल्याचा इशारा काँग्रेस कार्यकर्ते गिरीष कोत्तावार यांनी दिला.

# नांदेड जिल्ह्यात मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिरांचा यशस्वी समारोप

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ ऑगस्ट -**

महाराष्ट्र शासनाच्या जनकल्याणकारी उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या समन्वयाने जिल्हाभरात आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिरांचा यशस्वी समारोप झाला. १ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत ग्रामीण तसेच शहरी भागात एकूण १२२ शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांमध्ये १३ हजार ६१९ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली, तर ३ हजार १२१ आयुष्मान भारत व आभा कार्ड नोंदणी करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मंत्रालय, मुंबई चे कक्षप्रमुख तथा विशेष कार्य अधिकारी रामेश्वर नाईक यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राज्यभर राबविण्यात आला.

नांदेड जिल्ह्यात हा उपक्रम जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, आयुक्त, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका महेशकुमार डोईफोडे तसेच निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या राबविण्यात आला.

शिबिरांच्या प्रभावी नियोजन व अंमलबजावणीसाठी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार कापसे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय परके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका डॉ. हनमंत रीठ्ठे यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले.

**१३,६१९ नागरिकांची आरोग्य तपासणी**

या १२२ शिबिरांमध्ये ४,२१० पुरुष, ६,७२२ महिला, १,०६९ पुरुष बालक आणि १,६१८ महिला बालक, अशा एकूण १३,६१९ नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. याशिवाय ३,१२१ आयुष्मान भारत व आभा कार्ड नोंदणी करण्यात आली.

शिबिरांमध्ये नागरिकांची विविध आजारांसाठी आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला तसेच रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन व इतर आवश्यक निदान चाचण्या करण्यात आल्या. गरजू रुग्णांना पुढील उपचारासाठी योग्य रुग्णालयांमध्ये संदर्भित करण्यात आले. तसेच महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि इतर शासकीय आरोग्य योजनांतर्गत उपलब्ध उपचार सुविधांची माहिती नागरिकांना देण्यात आली.

**विविध यंत्रणांचा प्रभावी समन्वय**

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या वतीने वैद्यकीय अधिकारी डॉ. चंद्रकांत मुंडे, समाजसेवा अधीक्षक गजानन वानखेडे आणि समन्वयक संभाजी लोंढे यांनी जिल्ह्यातील शासकीय व संलग्नित खासगी रुग्णालये, आरोग्य विभाग तसेच संबंधित यंत्रणांशी सातत्याने समन्वय साधून शिबिरांचे नियोजन, आयोजन व प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित केली.

**उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीत योगदान**

या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीत डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जिल्हा सामान्य रुग्णालय, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका आरोग्य विभाग, जिल्हा परिषद आरोग्य विभाग, प्राथमिक आरोग्य केंद्रे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीशी संलग्नित खासगी रुग्णालये, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेशी संलग्नित रुग्णालये, तसेच वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका व संबंधित विभागांनी मोलाचे योगदान दिले.

**नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिरांना जिल्ह्यातील नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विशेषतः दुर्गम व गरजू नागरिकांना त्यांच्या परिसरातच आरोग्य तपासणी, निदान, मार्गदर्शन आणि पुढील उपचारासाठी संदर्भ सेवा उपलब्ध झाल्याने हा उपक्रम लोकाभिमुख व परिणामकारक ठरला.

भविष्यातही जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या समन्वयातून नागरिकांना गुणवत्तापूर्ण, सुलभ व वेळेवर आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी अशाच लोकाभिमुख आरोग्य उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

## ट्री गार्डसह १५० वृक्षांची लागवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ ऑगस्ट -**

हरित नांदेड अभियानाला शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, गुरुद्वारा लंगर साहिब, वृक्षमित्र फाऊंडेशन, यांच्या वतीने शहरात हरित नांदेड अभियान राबविण्यात येत असून या अंतर्गत मनपा क्षेत्रीय कार्यालय क्रमांक ३ गणेशनगर परिसरात पावडेवाडी नाका ते छत्रपती चौक या मुख्य मार्गावर ट्री गार्डसह १५० मोठ्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

# मुदखेड पोलीसांची अवैध रेती उत्खननावर धडक कारवाई



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ३ ऑगस्ट -**

नांदेड जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत मुदखेड पोलिसांनी मोठी कारवाई करत गोदावरी नदीपात्रातील अवैध रेती उत्खननाचा पर्दाफाश केला. या कारवाईत लोखंडी बोटी, रेती उपशासाठी वापरली जाणारी हायपर यंत्रसामग्री तसेच सुमारे २० ब्रास रेती असा एकूण १ कोटी १ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम सुरू आहे. त्याअंतर्गत २ ऑगस्ट रोजी मुदखेड पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी धीरज चव्हाण यांना गोपनीय माहिती मिळाली की, मुदखेड तालुक्यातील वासरी शिवारातील गोदावरी नदीपात्रात कोणतीही वैध परवानगी न घेता यांत्रिक पद्धतीने मोठ्या प्रमाणावर रेतीचे अवैध उत्खनन सुरू आहे. त्यानंतर महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती देत संयुक्त पथकाने घटनास्थळी छापा टाकला.

पोलीस पथक घटनास्थळी पोहोचताच काही जण तेथून पळून गेले. मात्र घटनास्थळी उपलब्ध असलेली चार लोखंडी बोटी, चार हायपर यंत्रसामग्री आणि नदीपात्रातून काढलेली अंदाजे २० ब्रास रेती जप्त करण्यात आली. जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे १ कोटी १ लाख इतकी असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

या प्रकरणी प्राथमिक चौकशीनंतर हनुमंत संभाजी पुयड (रा. पुणेगाव, ता. मुदखेड), ज्ञानेश्वर बळीराम पुयड, दिलीप माधव कांजाळकर (रा. वासरी, ता. मुदखेड) आणि भुजंग रामजी वाहिंदे (रा. वासरी, ता. मुदखेड) यांच्याविरुद्ध मुदखेड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२), ६२, ३(५) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील कलम ४८(७) व ४८(८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली मुदखेड पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तसेच महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तरीत्या पार पाडली.

दरम्यान, नांदेड जिल्हा पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले असून गोदावरी नदीपात्र किंवा इतर ठिकाणी अवैध रेती उत्खनन, वाहतूक अथवा गौण खनिज चोरीची माहिती मिळाल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यास किंवा नियंत्रण कक्षास कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पर्यावरण संरक्षण आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# डॉ. व्यंकटेश मामीलवाड यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २ ऑगस्ट -**

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त सिडको येथील नृसिंह विद्यामंदिर येथे आज शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

दक्षिण मतदार संघाचे आमदार आनंदराव पाटील बोंडकर यांच्या वाढदिवसानिमित्त नरसिंह विद्यामंदिर येथील बालकांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले यावेळी पाचशे पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना अतिआवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप सामाजिक कार्यकर्ते तथा माजी



जिल्हाप्रमुख युवासेना डॉ. व्यंकटेश मामीलवाड

यांनी केले यावेळी प्रसंगी याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे,मा.शहरप्रमुख साहेबराव मामीलवाड,नांदेड म.न.पा अग्निशमन मुख्याधिकारी दासरे सर,म.न.पा अग्निशमन कार्यालयीन अधीक्षक योगेश पेरकेवाड सर, नरसिंह विद्यामंदिर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती वंदना एकुंडवाड,कृष्णा पांचाळ,राजू(रॉक) निखाते,दिपक देशपांडे व समस्त शिक्षक वृंद,शिवसैनिक-युवासैनिक उपस्थितीत होते.

## गुटखा विक्री; चौघांना अटक

**तभा वृतसेवा**
**हि.नगर, दि. ३ ऑगस्ट -**

हिमायतनगर तालुक्यातील विरसणी येथे शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूची बेकायदेशीर विक्री करणाऱ्यांविरुद्ध हिमायतनगर पोलिसांनी कारवाई करत चार जणांना अटक केली. या कारवाईत एकूण १७ हजार ६०० रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिमायतनगर तालुक्यातील मौ. विरसणी येथील कोरपे किराणा दुकानावर सपोनि. विशाल वाठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली छापा टाकण्यात आला. पंचांसमक्ष केलेल्या तपासणीत प्रतिबंधित गुटखा, पानम साला व सुगंधित तंबाखू विक्रीसाठी साठवून ठेवल्याचे आढळून आले.

कारवाईदरम्यान केसरयुक्त गोवा-१००० पानमसाला, रजनीगंधा सुगंधित पानमसाला, के.एन.-०१ सुगंधित तंबाखू तसेच जी.एन. जर्दा सुगंधित तंबाखू असा एकूण १७ हजार ६०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. या प्रकरणी राजाराम बसप्पा कोरपे, गणपत तानाजी बारके, शेखर उर्फ मुशाब पवन आणि जुबेर खान पवन या चारजणांच्या विरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सपोनि. विशाल वाठोरे हे करीत आहेत.

# क्रांतिसिंह नाना पाटील यांना जिल्हा परिषदेत अभिवादन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ ऑगस्ट -**

जिल्हा परिषदेत आज क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, प्रभारी प्रकल्प संचालक तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, पंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक मयूरकुमार आंदेलवाड, नरेगाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, जिल्हा कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे, शिक्षणाधिकारी (योजना) दिलीप बनसोडे, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अवधूत गंजेवार यांच्यासह जिल्हा परिषदेतील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पर्यवेक्षक शिवदास मठपती सेवानिवृत्त

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. २ ऑगस्ट -**

बिलोली तालुक्यातील ग्राम बडूर येथील रहिवासी तथा सौ.मंजुळाबाई माध्यमिक विद्यालयाचे उपक्रमशील सहशिक्षक व शाळा पर्यवेक्षक शिवदास पार्वतीबाई राजेप्पा मठपती हे नियत वयोमानानुसार शुक्रवार दि.३१ जुलै रोजी अध्यापक सेवेतून सेवानिवृत झाले आहेत.

सर्वसामान्य कुटुंबात मठपती सरांचा जन्म व प्राथमिक शिक्षण बडूर,ता.बिलोली येथे तर माध्यमिक शिक्षण महर्षी कर्वे विद्यालय डोणगांव खुर्द,सन १९८६ साली दहावी उत्तीर्ण होऊन पुढे यशवंत महाविद्यालय उमरी येथे शिक्षण त्यांनी पूर्ण केले.

# स्वस्त धान्य दुकानांच्या जाहिरातीत १३ दुकानांचा समावेश नसल्याचा दावा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ ऑगस्ट -**

नांदेड शहरातील शासनमान्य स्वस्त धान्य दुकानांच्या नव्या जाहिर प्रगटनावरून वाद निर्माण झाला असून, नांदेड सेंट्रल को-ऑप. होलसेल कन्ज्युमर्स अँड रिटेल स्टोअर्स लिमिटेडच्या १३ स्वस्त धान्य दुकानांचा जाहिरातीत समावेश न केल्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी आक्षेप दाखल करण्यात आला आहे.निवेदनात म्हटले आहे की, संबंधित सहकारी संस्था मागील सुमारे २० वर्षांपासून बंद असून तिची नोंदणीही रद्द झाली आहे. त्यामुळे या संस्थेची दुकाने पर्यायी व्यवस्थेद्वारे सुरू ठेवण्यात आली होती. मात्र, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम-२०१३ तसेच ६ जुलै २०१७ आणि २ फेब्रुवारी २०२२ च्या शासन निर्णयांनुसार या दुकानांसाठी स्वतंत्र जाहिर प्रगटन काढण्यात आले नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

तसेच, दुकान क्रमांक २६, ५८, ३२, ४७, १, ६, ३३, ३४, २०, २४, ५१, ५६ आणि १०१ यांचा नव्या जाहिर प्रगटनातून समावेश वगळण्यात आल्याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात आणखी आरोप करण्यात आला आहे की, ११ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिर प्रगटनापूर्वी तालुका व जिल्हा पुरवठा कार्यालयाने वस्तुस्थितीची शहानिशा न करता वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल केली. तसेच न्यायप्रविष्ट प्रकरणांबाबत शासन अथवा मंत्रालय स्तरावर आवश्यक पत्रव्यवहारही करण्यात आला नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

याशिवाय, १३ जून २०२४ रोजी दाखल करण्यात आलेल्या अपीलावर कोणता निर्णय झाला, त्याची प्रमाणित प्रत देण्यात यावी, तसेच संबंधित प्रकरणात तालुका पुरवठा अधिकारी ते जिल्हा पुरवठा अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करून चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

निवेदनकर्त्यांनी २०२१ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या जाहिर प्रगटनानुसार प्राप्त व पात्र प्रस्तावांना प्रथम प्राधान्य देऊन निर्णय घ्यावा आणि त्यानंतरच आवश्यक असल्यास नवीन जाहिर प्रगटन प्रसिद्ध करावे, अशी मागणी केली आहे. तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करून बेरोजगार पात्र उमेदवारांना न्याय द्यावा, अशीही विनंती करण्यात आली आहे.